




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४२ ■ गुरूवार, दि. १२ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# विधानभवनला उडविण्याची धमकी !

## सुरक्षा यंत्रणा अलर्ट : मेट्रो, शेअर बाजारसह मुंबईतील चार ठिकाणं टार्गेट

प्रतिनिधी १२ मार्च

**मुंबई :** विधानभवन परिसरात गुरूवारी आज सकाळी एकच खळबळ उडाल्याचे दिसून आले. विधिमंडळ बॉम्बने उडवून देऊ, असा धमकीचा मेल आल्याने एकच धावपळ उडाली. या मेलनंतर पोलिसांनी तात्काळ संपूर्ण विधानसभा परिसरात सर्च ऑपरेशन सुरु केले. यावेळी सुरुवातील विधानसभा कर्मचाऱ्यांना बाहेर रोखण्यात आले. त्यानंतर थोड्यावेळाने आयडी आणि तपासणी केल्यानंतर पोलिसांकडून विधानभवनातील कर्मचाऱ्यांना विधानसभेत सोडण्यात आले. तसेच विधान भवनासह मेट्रो, शेअर बाजार अशी चार ठिकाणे टार्गेटवर असल्याचेही मेलमध्ये म्हटले आहे.

आज सकाळी सीपीएच्या मेलवर धमकी आली. अर्थसंकल्पीय अधिवेशन असल्यामुळे बॉम्ब आणि मिसाईलची धमकी होती. बॉम्ब डिस्पोजल स्कॉडने सर्व सखोल तपास सुरू केली आहे. आणखीन चार ठिकाणी धमकी दिली आहे, पोलिसांनी आवश्यक ती दखल घेतली आहे, अशी माहिती विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिली. सुरक्षा अधिकारी काळजी घेत आहेत, धमकीच्या पार्श्वभूमीवर तपास सुरू आहे. अधिकची माहिती एवढ्या लवकर उघड करण योग्य होणार नाही. चौकशी अंती सर्व माहिती दिली जाईल, असं राम शिंदेंनी सांगितले. तसेच शेअर बाजार, उच्च न्यायालय, मेट्रो आणि बँक



उडवून देण्याची धमकी मेलद्वारे देण्यात आली आहे. आज सकाळी ६.५७ मिनिटांनी धमकीचा मेल आला होता, असे राम शिंदे म्हणाले. विधिमंडळ, मेट्रो, बॉम्बे स्टॉक एक्सचेंजला धमकी देणारा मेल खलिस्तानी आंदोलकांशी संबंधित असल्याचे समोर आले आहे. धमकी देणाऱ्याने मिसाईल आणि बॉम्बने संबंधित ठिकाणं उडवून देण्याचं मेलमध्ये नमूद केलं. सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी मेल आल्यानंतर तत्काळ सुरक्षेच्या गृह विभागाकडून सूचना देण्यात आल्या.

### जनतेचे लक्ष विचलित करण्याचा एक स्टंट- विरोधकांची टीका

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. यातच मुंबईतील विधानभवन बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे. केवळ विधानसभा नाही, तर बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, मुंबई उच्च न्यायालय, मेट्रो यांबाबतही धमकीचा मेल आला आहे. यावर विरोधकांनी टीका केली असून, हा एक स्टंट असू शकतो. गंभीर समस्येपासून जनतेचे लक्ष विचलित करण्याचा प्रकार असू शकतो, असा दावा करत विरोधकांनी टीका केली आहे. सरकार अडचणीत येऊ लागले की अशा प्रकारच्या घटना घडवून आणल्या जात असतात. या प्रकरणाची सखोल चौकशी होणार नाही आणि धमकी देणाऱ्या व्यक्तीला कधीच समोर आणले जाणार नाही, असा दावा करत शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी सरकारवर टीका केली. या घटनेमागे अंधभक्त असलेला एखादा व्यक्ती असू शकतो. देशातील इतर महत्त्वाच्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी हा प्रकार घडवून आणला असावा, असा दावा राजू शेट्टी यांनी केला.

### विधान भवनाची सुरक्षा व्यवस्था वाढवली!

विधिमंडळाचे कामकाज सुरू असल्याने विधान भवन परिसरात मंत्री, आमदार आणि अधिकाऱ्यांची मोठी गर्दी असते. अशावेळी मिळालेल्या या धमकीमुळे विधान भवनाची सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. पोलिसांनी हा ईमेल कोठून आला, याचा तांत्रिक तपास सुरू केला आहे. ही धमकी केवळ अफवा आहे की घातपाताचा प्रयत्न, याचा शोध पोलीस घेत आहेत.

# आज अकोलेकरांसाठी 'हीट वेव्ह'चा इशारा



प्रतिनिधी १२ मार्च

**अकोला:** विदर्भातील तापमानाचा पारा चढत असतानाच, नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने अकोला जिल्ह्यासाठी गुरुवार पर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. दूपारी सुटणाऱ्या शाळांचे काय असा प्रश्न पालकांना पडला आहे. बुधवारी ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर आज सकाळी किमान तापमान २०.७ अंश सेल्सिअस इतके होते.

वाढत्या तापमानामुळे उष्मघाताचा धोका संभवतो. त्यामुळे दुपारी १२ ते ४ या वेळेत अत्यंत आवश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्यासाठी खालील मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. उष्णतेच्या लाटेत सुरु असलेल्या शाळा व विद्यार्थ्यांच्या परिक्षा यामुळे पालक वर्ग देखिल चिंतेत आहे. शाळांना उष्णतेची लाट पाहता सकाळच्या सत्रात शाळा घेण्याची गरज पालकांनी व्यक्त केली आहे.

या गोष्टीकडे शिक्षणाधिकारी आणि जिल्हा प्रशासनाने त्वरीत लक्ष देण्याची मागणी समोर आली आहे. हवामान खात्याने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला असताना दूपारी सुटणाऱ्या शाळा या पालकांसाठी आणि मुलांसाठी अडचणीच्या ठरत आहे.

# बुलडाण्यात २४ तासात सहा जण बेपत्ता!

## एका विवाहितेसह मुली व एका युवकाचा समावेश, पोलीस विभागावर प्रश्नचिन्हे

प्रतिनिधी १२ मार्च

**बुलडाणा :** जिल्ह्यात मुली व विवाहित महिला अचानक बेपत्ता होण्याचे सत्र थांबत नसल्याचे चित्र आहे. बुलडाणा जिल्ह्यातून सरासरी दररोज पाच ते सहा मुली किंवा विवाहिता बेपत्ता होत आहेत. गत २४ तासात जिल्ह्यातून एका विवाहितेसह पाच मुली व एक युवक असे सहा जण बेपत्ता झाल्याची नोंद आहे. मात्र यावर पोलीस प्रशासनाकडून कुठली ही ठोस उपाययोजना करण्यात येत नसल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. यावर मात्र पोलीस, सामाजिक संस्था किंवा महिला आयोग काहीही बोलण्यास तयार नाही. बुलडाणा जिल्ह्यातून अल्पवयीन मुलींसह महिला व सज्ञान मुली बेपत्ता होण्याचा प्रमाण लक्षणीय वाढले असून गेल्या २४ तासात जिल्ह्यातील सहा मुलींसह एक विवाहिता बेपत्ता झाली आहे. तर १ जानेवारी ते १० मार्चपर्यंत जिल्ह्यातील २८९ जण बेपत्ता झाले आहेत. त्यात २०० च्या वर महिला आहेत. बेपत्ता झालेल्या महिला व मुलींचे प्रमाण वाढलं असल्याने सर्वसामान्य पालकांमध्ये चिंतेच व दहशतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

### बुलडाण्यात 'महिला मिसिंग डेस्क' स्थापन

जिल्ह्यामध्ये विविध कारणांनी महिला हरविण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून अशा हरविलेल्या महिलांचा यशस्वी शोध घेण्याचे काम जिल्हा पोलीस दल करीत आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने हरविलेल्या महिलांचा शोध घेण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय पोलीस नियंत्रण कक्ष बुलडाणा येथे 'महिला मिसिंग डेक्स', तर जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर 'मिसिंग सेल' कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

# आता चुलीवर स्वयंपाक करावा लागेल..
# गोवऱ्या आणि लाकडांना मागणी राहणार

प्रतिनिधी १२ मार्च

**अकोला:** अनेक ठिकाणी गॅस सिलेंडर उपलब्ध होत नसल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी अधिक पैसे देत ते विकत घ्यावे लागत आहे. अशा वेळी गोवऱ्या आणि लाकूड इंधन म्हणून वापरण्याचा पर्याय लोकांना वापरावा लागत आहे.

सिलिंडरची जागा चुली घेणार अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यासाठी लागणाऱ्या गोव-या लाकडे यांची मागणी अचानक वाढली आहे.

पूर्वी गावांमध्ये सहज उपलब्ध होणाऱ्या गोव-या शहरात पैसे देऊन विकत घ्याव्या लागत आहेत. शहरातील अनेक भागात होळीच्या काळात १० रुपयांना ४ गोव-या मिळत होत्या, मात्र आता एक गोवरी १५ रुपयांना तीन अशा दराने विकल्या जात आहेत. तसेच काही दिवसापूर्वी दीडशे रुपयांना १०० नग मिळणा-या गोव-या आता दुप्पट पैसे मोजून घ्याव्या लागणार आहेत. इराण अमेरिका युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती जुन्या काळात जाण्यासाठी भाग पाडणार असे दिसते. पूर्वी पाणी तापवणे तसेच स्वयंपाक करण्यासाठी चूल बंबाचा



वापर होत असे. परंतु बदलत्या काळात या गोष्टी बाजूला झाल्या. गॅसचा वापर अगदी ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात होऊ लागला. परंतु आता सिलिंडरची कमतरता जाणवते आहे. या समस्येमुळे आता शहरातील नागरिकांनाही गावाप्रमाणे चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे.


CLASSIFIED

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606
7757905649

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट

अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250
8788432278

**जिंदगी बेहतर करने का सुनहरा अवसर**

WORK FROM HOME

संधी सर्वांसाठी, घर से काम करें सभी के लिए बराबर अवसर?

Work Part Time/Full time

कौन कर सकता है?

स्टुडन्ट/ गृहिणी/ व्यापारी/ नौकरी/ बेरोजगार/ व्यवसायी/ रिटायर्ड / कर्मचारी जॉब करते हुए

-:संपर्क:-
9765357896

**२ बीएचके फ्लॅट विकणे आहे**

सेकंड फ्लोअर, पूर्वमुखी, ८५० स्क्वेअर फूट, सेमी फर्निश, स्वतंत्र पार्किंग, हवेशीर प्रशस्त ४५ लाख निगोशिएबल, 'रचना पाम' वरदविनायक अपार्टमेंट, गनेडीवाल लेआऊट, क्यांम्प, अमरावती.

संपर्क
7038424614
9823077585


# स्ट्रेट होर्मुझमधून पहिला तेल टँकर मुंबईत दाखल!

प्रतिनिधी १२ मार्च

**मुंबई :** अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझ या सामुद्रधुनी मार्गे तेलाने भरलेला पहिला टँकर भारतात पोहचला आहे. सौदी अरेबियातून कच्चे तेल घेऊन आलेला हा टँकर मुंबई पोर्टवर पोहचला आहे. युद्धभूमीतून सुरक्षितपणे भारतात पोहचणारा हा पहिला टँकर आहे. अमेरिका-इस्त्रायलनेइराणवर हवाई हल्ले केले. या युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझमधील सागरी वाहतूक ठप्प झाली होती. लायबेरियाचा झेंडा असलेल्या शेनलॉन्ग सुएझमॅक्स या जहाजाने १ मार्च रोजी सौदीच्या रास तनुरा बंदरातून कच्चे तेल भरले आणि दोन दिवसांनी तिथून निघाले. सागरी डेटा फर्म लॉयड्स लिस्ट इंटेलिजेंस आणि टँकरट्रॅकर्सच्या मते या जहाजाचे शेवटचे सिग्नल स्थान ८ मार्च रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीत होते. हे जहाज अशावेळी भारतात पोहचले आहे जेव्हा इराणने अनेक मर्चेंट शिपवर हल्ले केलेत. चीनला जाणाऱ्या जहाजांशिवाय इतर कुठल्याही जहाजांना या सामुद्रधुनीमार्गे वाहतूक करण्यावर इराणने बंदी घातली होती.

# जलसंधारण विभागाने मंत्रालयात दिली दिशाभूल करणारी माहिती....
# जलसंधारणातील घोळ संपता संपेना, विधीमंडळात प्रश्न उपस्थित

प्रतिनिधी १२ मार्च

**अकोला:** अकोला जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागांतर्गत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना मधील गॅम्बियन बंधाऱ्यांच्या कामांमधील कथित अनियमिततेबाबत विचारणा विधीमंडळात उपस्थित झाली. या विषयावर राज्य सरकारला स्थानिक प्रशासनाने चुकीचे उत्तर देत दिशाभूल केल्याची माहिती समोर आली आहे. विशिष्ट कंत्राटदाराला कंत्राट देण्यासाठी जलसंधारण विभागातील अधिकाऱ्यांची मिलिभगत स्पष्टपणे अधोरेखित होत आहे. इतकेच नाही तर लोकप्रतिनिधींचा वरदहस्त या सर्व प्रकरणात असून तो लोकप्रतिनिधी कोण अशी विचारणा आता होत आहे. तर नव्याने प्राप्त माहिती नुसार जलसंधारण विभागातील भ्रष्टाचाराची विविध प्रकरणे लपविण्यासाठी एका उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्याने काही महिन्यात अकोल्यात पी.ए. म्हणून चार्ज घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्याची देखील चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

डिसेंबर २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात अकोला जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'पाणलोट विकास घटक २.०' अंतर्गत कामांच्या वाटपात पारदर्शकतेचा अभाव आणि आर्थिक अनियमितता झाल्याच्या तक्रारी समोर आल्या आहे. लाखो रुपयांच्या कामांचे चुकीच्या पद्धतीने वाटप झाल्याचा मुद्दा चर्चेत आहे. इतकेच नाही तर ४३ कामांच्या निविदा प्रक्रियेत गंभीर त्रुटी अधोरेखित झाल्या आहे. नियमानुसार मोठ्या कामांच्या निविदा 'महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल'वर आणि विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक असते. मात्र, या प्रकरणात तसे न करता, कमी खपाच्या आणि जिल्ह्यात फारशा परिचित नसलेल्या स्थानिक दैनिक व साप्ताहिकांमध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ दरम्यान या जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्याचा आरोप आहे. जिल्हा माहिती अधिकाऱ्याने या विषयीच्या निविदा प्रसिध्द केल्याचा दावा जलसंधारण विभागाने केला आहे. कमी खपाचे व लोकप्रिय नसलेल्या दैनिकात या निविदा कोणी प्रसिध्द केल्या. त्या विषयी जलसंधारण विभागाने कुठल्या दैनिकाचा आग्रह धरला याची माहिती मात्र लपविण्यात आली आहे. कारण विशिष्ट कंत्राटदारांची रिंग करत कामे वाटप झाल्याची ओरड सुरु झाली आहे. जिल्हा जलसंधारण अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांनी संगनमत करुन एकाच कंत्राटदाराला किंवा त्याच्याशी संबंधित संस्थांना ३ ते ४ कामांचे कार्यारंभ आदेश दिल्याची ओरड सुरु झाली असून हे कंत्राटदार कोण अशी विचारणा झाली आहे. पाणलोट समितीच्या ठरावाच्या आधारावर कामे करण्याची गरज होती. असे असताना जिल्हा जलसंधारण विभागाने आधी कामे केली आता पाणलोट समितीच्या अहवालांसाठी विभागाचे कर्मचारी बॅक डेट मध्ये ठराव जमा करत फिरत आहे. विभागाच्या संगणक चालकाची भूमिका या सर्व प्रकरणात तपासण्याची गरज असून डी.डी.एक आणि वेगवेगळ्या कंत्राटदारांचे कामे अनेक असा प्रकार येथे झाला काय याची चौकशी होण्याची गरज आहे.



# .....आता अकोलेकर 'गॅस'वर!

## नागरिकांची दुहेरी होरपळ, गॅस एजन्सींसमोर रांगा

प्रतिनिधी १२ मार्च

**अकोला :** जिल्ह्यात कधी नव्हे एवढा घरगुती गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. राज्य शासन आणि अधिकारी वर्ग कितीही सांगत असले की गॅस पुरवठा सुरळीत व पुरेसा आहे, तरी वास्तव मात्र वेगळेच आहे. ऑनलाइन बुकींग बंद केली आहे, बुकिंग कालावधी ३० दिवसांवर गेला आहे. तोही मिळेल की नाही, याची शाश्वती नाही. अनेक नागरिक सिलिंडर घेऊन सकाळपासूनच गॅस एजन्सीसमोर रांगा लावत आहेत. ग्रामीण भागात तर यापेक्षाही विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक गोदाम रिकामे असून, वरूनच गॅसचा ट्रक आला नाही, आला की गॅस



पुरवठा व्यवस्थित करण्यात येईल, असे गुळगुळीत उत्तर देऊन ग्राहकांची बोळवण करण्यात येत आहे. याचा परिणाम प्रतीक्षा यादी वाढण्यावर होत असून, 'प्रथम बुकिंग प्रथम प्राधान्य' असे धोरण राबविण्यात येत असल्याने जनतेची सध्या दुहेरी होरपळ होत आहे. वरून सूर्य ओकत आहे तर दुसरीकडे गॅसचा भडका जनतेला असह्य होत आहे.

अमेरिका-इराण युद्धाची धग आता सर्वसामान्यांपर्यंत येऊन पोहोचली आहे. दैनंदिन गरजांवर त्याचा परिणाम होत असल्याने सर्वसामान्य जनता मेटाकुटीस आली आहे. कारण इंधनाचा पुरवठा हा आखाती देशातून होत असल्याने संपूर्ण देशात आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. याचा पहिला आघात झाला तो हॉटेल व कॅटरिंग व्यवसायावर देशातील जवळपास ३० ते ४० टक्क्यांच्यावर हॉटेल आजघडीला बंद आहेत. पुढे अशी परिस्थिती राहिली तर ही टक्केवारी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिस्थिती किती गंभीर आहे, हे केंद्र शासनाने 'एस्मा' कायदा लावून एक प्रकारे सर्वसामान्यांना धोक्याचा संकेतच दिला आहे. मात्र सोशल मीडिया व प्रसार माध्यमांवरून सर्व आलबेल असल्याचे आभासी चित्र निर्माण करण्यात येत असल्याचे सुज्ञ नागरिकांचे मत आहे. हे काही असले तर सध्या परिस्थितीत सर्वसामान्य जनता घरगुती गॅससाठी रस्त्यावर उतरली आहे, एवढे मात्र निश्चित.

### व्यावसायिक सिलिंडर बंद!

सध्या व्यावसायिक सिलिंडरचे वितरण जिल्ह्यातील गॅस वितरक कंपन्यांनी बंद केले आहे. काही ठिकाणी वितरण होत असले तरी ते १०० टक्क्यांवरून १० टक्क्यांवर आले आहे. त्यामुळे हॉटेल व्यवसाय, कॅटरिंग सेवा विस्कळीत झाली आहे. याचा सरळ परिणाम सामूहिक कार्यक्रमांवर होत आहे. तसेच खाद्य पदार्थांच्या भाववाढीवर होत आहे.

### ऑनलाइन बुकिंग बंद!

शासनाने घरगुती गॅस सिलिंडरची ऑनलाइन बुकिंग बंद केली आहे. त्यामुळे जनतेला ४० अंशावरील तापमानात गॅस एजन्सीजवर सकाळपासूनच रांगा लावाव्या लागत आहेत. तसेच बुकिंग केल्यावरही सिलिंडर मिळेपर्यंत प्रतीक्षाच करावी लागत आहे. तसेच बुकिंगचा कालावधी वाढविण्यात आल्याने मोठे कुटुंब असलेल्यांचे हाल होत आहेत. तर दुसरीकडे नागरिकांना अत्यावश्यक असलेल्या घरगुती गॅसचा काळाबाजार होत असल्याचेही वास्तव आहे. अनेक जण १५०० ते १६०० रूपयांपर्यंत घरगुती गॅस सिलिंडर घेत आहेत.

### वाहतूक व्यवस्थेवर विपरीत परिणाम

शहरात पेट्रोल-डिझेल सध्या सुरळीत सुरू असले तरी गॅसवर चालणाऱ्या वाहनांना गॅस भरण्यासाठी भटकंतीची वेळ आली आहे. अकोल्या शहरात सिव्हिल लाइन रोडवर असलेल्या गो गॅसच्या पंपावर ऑटोधारकांच्या सकाळपासूनच रांगा लागत आहेत. त्यामुळे कंपनीवाले दर दिवसाला गॅसचे दर वाढवित असून, यांना 'एस्मा' कायदा लागू नाही का, असा सवालही ऑटो चालक उपस्थित करीत आहेत. गॅस तोच असताना व नवीन गाडी आली नसतानाही ही भाववाढ का, यावर कोणाचे नियंत्रण का नाही, पुरवठा विभाग काय करीत आहे, असे अनेक प्रश्न ऑटो चालकांनी उपस्थित केले आहेत.

### ग्रामीण भागात अभूतपूर्व तुटवडा

जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी जिल्ह्यात गॅसचा तुटवडा नसल्याचे सांगितले असले तरी ग्रामीण भागातील एजन्सीधारक सिलिंडरच नसल्याचे सांगत आहेत. ट्रक आल्यानंतर सिलिंडर मिळेल असे सांगून बुकींग करून घेत आहेत. त्यामुळे बुकिंगचा आकडा फुगत असून, आपला नंबर कधी येईल, या प्रतीक्षेत त्यांना पुन्हा चुलीकडे वळावे लागत आहे. आता ग्रामीण भागातील नागरिक गॅसला पर्याय म्हणून गोवऱ्या, जळतण यांचा वापर करीत असून, त्याच्या किमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

### इण्डेक्स स्टोव्हच्या किमती वाढल्या!

घरगुती गॅसचा तुटवडा असल्याचा फायदा इलेक्ट्रिक उपकरण विक्रेत्यांनी घेणे सुरू केले आहे. मागणी वाढताच या उपकरणांचे दर अचानक वाढले आहेत. इण्डेक्स स्टोव्ह (विजेवर चालणार स्टोव्ह)चे दर एकाएकी दीड ते दोन पटीने वाढले आहेत. तसेच कोळसा, लाकूड, गोवऱ्या यांचेही दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. अनेक नागरिक गॅसला पर्याय म्हणून या साधनांचा वापर करतात. त्यामुळे सर्वसामान्यांपासून ते व्यावसायिकांपर्यंत सर्वच सध्या 'गॅस'वर असल्याचे दिसून येत आहे.

### घरपोच पोहोचविणाऱ्यांचे फोन बंद!

सध्या गॅस सिलिंडरवाल्याचे भाव वधारल्याचे नागरिक व व्यावसायिक सांगत आहेत. त्यांना गॅस सिलिंडर केव्हा मिळेल याची विचारणा करण्यास गेले असता त्यांचे फोन बंद येत आहेत किंवा काही उचलत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काहींना व्यावसायिक सिलिंडर जमा करूनही दुसरे सिलिंडर मिळत नसल्याने आणि घरगुती सिलिंडर वापरता येत नसल्याने त्यांच्यावर व्यवसाय बंद ठेवण्याशिवाय कोणताच पर्याय उरला नाही.

सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# दिव्यांग लाभार्थ्यांनी ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन

**अमरावती:** अमरावती शहर तहसीलदार (संजय गांधी योजना) यांच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक अर्थसहाय्य योजनांमधील दिव्यांग लाभार्थ्यांनी त्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र आधार कार्डशी संलग्न करणे अनिवार्य करण्यात आले आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना, तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ व विधवा योजनेच्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया ३१ मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार डॉ. प्रियांका मिसाळ यांनी केले आहे. शासन निर्देशानुसार, ज्या दिव्यांग लाभार्थ्यांचे आधार कार्ड त्यांच्या युडीआयडी कार्डशी लिंक नसेल, अशा लाभार्थ्यांचे एप्रिल २०२६ पासून मिळणारे २ हजार ५०० रुपये मासिक अनुदान तांत्रिक कारणास्तव थांबण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांचे अनुदान सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्याचे प्रमाणपत्र संजय गांधी योजना कार्यालय, अमरावती शहर येथे ३१ मार्चपर्यंत सादर करणे बंधनकारक आहे.

# नारीशक्तीचा गौरव : आदर्श हायस्कूल दर्यापूर येथे महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान

प्रतिनिधी १२ मार्च

**दर्यापूर :** आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाजाच्या सर्वच क्षेत्रांत महिलांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर निर्माण केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी अमरावती वर्षा प्रमोदराव मेंढे, पोलीस उपनिरीक्षक नम्रता राठोड, वनरक्षक सीमा प्रकाशराव पवार (वनविभाग दर्यापूर) तसेच




नगरसेविका व बालविकास कल्याण समितीच्या मंगला राजा तराळ यांचा शाल, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच शाळेतील सर्व महिला अध्यापिकांनाही पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मनोज देशमुख होते. प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक एस. बी. ठाकरे, शिक्षक प्रतिनिधी अनिल भारसाकळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी पि. डी. गावंडे, हायस्कूलचे प्रभारी पी. एम. काळे तसेच इयत्ता पाचवी ते आठवीचे प्रभारी डी. बी. ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतीश राऊत यांनी केले. त्यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगत महिलांचे समाजातील योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे नमूद केले. यावेळी वर्षा मेंढे यांनी महिलांचे शिक्षण, स्वावलंबन आणि समाजातील वाढती भूमिका यावर मार्गदर्शन केले. नम्रता राठोड यांनी महिलांच्या सामर्थ्याचा गौरव करत

स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधारस्तंभ नसून समाजाच्या प्रगतीची शक्ती असल्याचे सांगितले. शिक्षण, धैर्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर महिलांनी प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. मंगला तराळ यांनी स्त्री ही संस्कारांची जननी आणि समाज परिवर्तनाची प्रेरक शक्ती असल्याचे सांगत महिलांच्या शिक्षणाचे, स्वावलंबनाचे आणि सामाजिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण, संस्कार आणि आत्मविश्वास यांच्या आधारावर प्रत्येक स्त्री आपल्या आयुष्यात यशाची नवी उंची गाठू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात मनोज देशमुख यांनी महिलांच्या कर्तृत्वाचे कौतुक करत सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थ्यांनी महिला सन्मानाची जाणीव ठेवून समाजात सकारात्मक बदल घडवावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन डी. बी. ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक-शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी एस. बी. खांडे यांनी आभार प्रदर्शन केले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दिव्यांग लाभार्थ्यांच्या मानधनात हजार रुपयांची वाढ

## २० मार्चपूर्वी युडीआयडी आणि आधार अपडेट करा

प्रतिनिधी १२ मार्च

**अमरावती:** राज्यातील दिव्यांग बांधवांसाठी त्यांच्या मासिक अनुदानात हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. आता लाभार्थ्यांना दरमहा २ हजार ५०० रुपये अनुदान थेट बँक खात्यात मिळणार आहे. मात्र, या वाढीव लाभाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी आपले ऑनलाईन युडीआयडी कार्ड आणि आधार कार्ड अपडेट करणे अनिवार्य आहे.


जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजनेतील २१ हजार ३५९ आणि श्रावणबाळ योजनेतील १ हजार ९१३ अशा एकूण २३ हजार २७२ लाभार्थ्यांचे युडीआयडी कार्ड अद्याप आधारशी संलग्न नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, कोणताही दिव्यांग लाभार्थी या वाढीव लाभापासून वंचित राहू नये, यासाठी लाभार्थ्यांनी आपले युडीआयडी कार्ड, आधार कार्ड आणि बँक पासबुकची झेरॉक्स संबंधित गावातील तलाठी कार्यालय किंवा तहसील कार्यालयातील संजय गांधी योजना विभागात २० मार्च २०२६ पूर्वी जमा करावे. तसेच, लाभार्थ्यांनी स्वतःहून युडीआयडी पोर्टलवर जाऊन आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. विहित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न झाल्यास अनुदानात अडचणी येऊ शकतात, याची लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

# मेळघाट संघर्ष महापदयात्रेमुळे अन्यायग्रस्त अखंडे कुटुंबाला न्याय

## पोलीसांकडून ट्रॅक्टरसह ५० हजार रुपये परत

प्रतिनिधी १२ मार्च

**चिखलदरा :** मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या प्रश्नांसाठी निघालेल्या बच्चू कडू यांच्या मेळघाट संघर्ष महापदयात्रेमुळे अन्यायग्रस्त कुटुंबाला अखेर न्याय मिळाल्याची घटना बोरूगव्हाण गावात घडली आहे. या घटनेमुळे मेळघाटातील सर्वसामान्यांना आपला हक्काचा आवाज मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. मेळघाटातील बोरूगव्हाण येथील राजेश अखंडे यांनी काही महीन्यांपुर्वी नव्याने ट्रॅक्टर खरेदी केला होता. शेतीच्या कामासाठी ट्रॅक्टर शेतात घेऊन जात असताना गावातील खराब आणि खड्डेमय रस्त्यांमुळे ट्रॅक्टरचा अपघात झाला. या दुर्दैवी अपघातात राजेश अखंडे यांचा जागीच मृत्यू झाला. कुटुंबासाठी



आधार असलेल्या राजेश यांच्या मृत्यूमुळे अखंडे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला.

अपघातानंतर पंचनामा करण्यासाठी पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी ट्रॅक्टर जप्त केला. मात्र ट्रॅक्टर परत मिळवण्यासाठी राजेश यांच्या कुटुंबीयांकडून तब्बल ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला. कुटुंबीयांनी मोठ्या कष्टाने ही रक्कम दिली, तरीही त्यांना ट्रॅक्टर परत मिळाला नाही. त्यामुळे आधीच संकटात सापडलेल्या या कुटुंबाची अडचण आणखी वाढली. या अन्यायाविरोधात अखंडे कुटुंबाने अनेक ठिकाणी मदतीची याचना केली, मात्र कुठूनही त्यांना न्याय मिळाला नाही. अखेर बच्चू कडू यांच्या नेतृत्वात सुरू असलेली मेळघाट संघर्ष महापदयात्रा बोरूगव्हाण गावात पोहोचली असताना राजेश अखंडे यांच्या आईने ही संपूर्ण घटना बच्चू कडू यांच्या कानावर घातली. ही बाब समजताच बच्चू कडूंनी ती गंभीरतेने घेतली. ९ तारखेला झालेल्या सभेत त्यांनी सर्वांसमोर प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, अखंडे कुटुंबाचा ट्रॅक्टर आणि ५० हजार रुपयांची रक्कम तात्काळ परत देण्यात आली नाही, तर चिखलदरा पोलीस स्टेशनवर मोठा मोर्चा काढण्यात येईल.

बच्चू कडूंच्या या इशाऱ्यानंतर प्रशासनात खळबळ उडाली. अखेर प्रशासनाने तातडीने कारवाई करत अखंडे कुटुंबाला ट्रॅक्टर परत दिला तसेच घेतलेली ५० हजार रुपयांची रक्कमही परत केली. यावेळी अखंडे कुटुंबीयांनी बच्चू कडू यांचे मनापासून आभार मानले.

# नवसारी परिसरातील स्वच्छता समस्येवर महापौरांची पाहणी; दुसऱ्या रॅमची व्यवस्था करण्याचे निर्देश

प्रतिनिधी १२ मार्च

**अमरावती :** नवसारी परिसरात स्वच्छतेच्या संदर्भात निर्माण झालेल्या समस्यांमुळे स्थानिक नगरसेवकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर समस्यांचे प्रत्यक्ष स्वरूप जाणून घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांना प्रभागात भेट देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. नवसारी येथील नगरसेवक ऋषिकेश देशमुख तसेच स्वीकृत नगरसेवक भोजराज काळे यांनी महापौरांना आग्रहाचे निमंत्रण देत परिसरातील स्वच्छतेसंदर्भातील समस्या



सोडवून देण्याची विनंती केली होती. महापौरांनी प्रभागाला भेट दिल्यानंतर स्थानिक परिस्थितीची सविस्तर पाहणी केली. या वेळी अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, नगरसेवक चंदु खेडकर, गुड्डु धर्माळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव तसेच कोणार्क कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. महापौरांनी या सर्व अधिकाऱ्यांसमवेत परिसरातील नगरसेवक व नागरिकांच्या समस्या शांतपणे ऐकून घेतल्या आणि त्यावर तत्काळ उपाययोजना करण्याबाबत चर्चा केली.

तपोवन ते नवसारी या परिसरातील कचरा व्यवस्थापनासाठी प्रभागातील घंटागाड्यांद्वारे कचरा एका ठिकाणी असलेल्या कंटेनरमध्ये टाकण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या व्यवस्थेअंतर्गत विविध भागांतून गोळा करण्यात येणारा कचरा घंटागाड्यांद्वारे या कंटेनरपर्यंत आणला जातो. मात्र, प्रत्यक्ष पाहणीदरम्यान त्या ठिकाणी एकाच वेळी सुमारे पाच ते सहा घंटागाड्या उभ्या असल्याचे महापौरांच्या निदर्शनास आले. त्यामुळे कचरा टाकताना अडथळे निर्माण होत असल्याचे आणि कामकाजात विलंब होत असल्याचे स्पष्ट झाले. या समस्येमुळे परिसरातील स्वच्छतेच्या कामावर परिणाम होत असल्याची माहिती स्थानिक नगरसेवकांनी महापौरांना दिली. तसेच कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करण्यासाठी अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

# अमरावती महानगरपालिका व संगिनी महिला संघद्वारे नृत्य स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी १२ मार्च

**अमरावती :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अमरावती महानगरपालिका व संगिनी महिला संघ यांच्या संयुक्त विद्यमाने साई नगर येथील साईरत्न लॉन येथे भव्य नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला, नागरिक व नृत्यप्रेमी उपस्थित होते. महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार श्री. रवी राणा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर . सचिन भेंडे तसेच देवा भाऊ शेंडे उपस्थित होते. आयोजक आरतीताई शेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार




पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी आमदार श रवी राणा, उपमहापौर सचिन भेंडे, नगरसेवक संजय हिंगासपुरे, प्रशांत वानखडे, महेश मुलचंदानी, नगरसेविका नंदाताई सावदे, प्रियंकाताई पाटणे, ॲड. प्रितीताई रेवणे, मिराताई कांबळे, मंजूषाताई जाधव, सुरेखाताई लुंगारे, पद्मजा कौंडण्य, अर्चनाताई पांडे, डॉ. मधुराताई कहाळे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. कार्यक्रमादरम्यान नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांचा सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी मान्यवरांना स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

प्रथम लेडी व माजी लेडी गव्हर्नर कमलताई गवई, कु. थापा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त, आदर्श शिक्षिका डॉ. संगीता धोपटे यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करताना उपस्थित मान्यवरांनी महिलांनी समाजाच्या विविध क्षेत्रांत केलेल्या योगदानाचे कौतुक केले.

यानंतर भव्य नृत्य स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत विविध वयोगटातील स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला. सहभागी स्पर्धकांनी आपल्या अनोख्या नृत्यशैली, सुंदर सादरीकरण आणि उत्कृष्ट कलागुणांद्वारे उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. पारंपरिक तसेच आधुनिक नृत्यप्रकारांचे सादरीकरण करून स्पर्धकांनी कार्यक्रमाची रंगत अधिक वाढवली. प्रेक्षकांनीही टाळ्यांच्या कडकडाटात या सादरीकरणांना भरभरून दाद दिली. नृत्य स्पर्धेनंतर आरतीताई शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला मंडळाच्या वतीने विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले होते.

या स्टॉलवर भारतीय पारंपरिक व्यंजनांसह विविध प्रकारचे पदार्थ उपलब्ध करून देण्यात आले होते. या उपक्रमामागे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा तसेच महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्याचा उद्देश होता. उपस्थित नागरिकांनी मोठ्या उत्साहाने या स्टॉलवर भेट देत खाद्यपदार्थांची खरेदी केली. यामुळे महिलांच्या आर्थिक मनोबलाला बळ मिळाले. या उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी विशेष कौतुक केले.

# अमरावती महानगरपालिकेची कारवाई : टॅक्स न भरल्यामुळे दस्तूरनगर येथील मालमत्ता सील

प्रतिनिधी १२ मार्च

**अमरावती:** मालमत्ता कर थकबाकीदारांवर अमरावती महानगरपालिकेने आपली कारवाई अधिक तीव्र केली असून आज पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत दस्तूरनगर परिसरात एका थकबाकीदार मालमत्तेवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली. वारंवार सूचना देऊनही कर न भरल्यामुळे महानगरपालिकेने ही कठोर कारवाई केल्याचे समजते.

महानगरपालिकेकडून मिळालेल्या माहितीनुसार, दस्तूरनगर येथील मालमत्ता क्रमांक ३८१ ही श्रीमती कमलबाई खंडेलवाल यांच्या नावावर आहे. संबंधित मालमत्तेचा मालमत्ता कर बराच काळ प्रलंबित होता. महानगरपालिकेच्या कर वसुली



विभागाने या संदर्भात मालमत्ताधारकांना अनेक वेळा नोटीस बजावून थकीत कर भरण्याबाबत सूचना दिल्या होत्या. तसेच कर भरला नाही तर संबंधित मालमत्तेवर जप्ती किंवा सीलची कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला होता.

मात्र दिलेल्या मुदतीत थकबाकीचा भरणा न झाल्यामुळे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आज दस्तूरनगर येथे भेट देत मालमत्ता क्रमांक ३८१ या वास्तूवर अधिकृतपणे सील लावण्याची कारवाई केली. यावेळी झोन क्र.३ चे सहाय्यक आयुक?त नितीन बोबडे, महानगरपालिकेच्या कर वसुली विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संबंधित ठिकाणी पंचनामा करून नियमांनुसार संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात आली. अमरावती महानगरपालिकेने सध्या शहरात मालमत्ता कर वसुली मोहीम हाती घेतली आहे. आर्थिक वर्ष संपण्यास काही दिवस शिल्लक असताना थकीत कराची वसुली करण्यावर महानगरपालिकेने विशेष भर दिला आहे.

# अतिक्रमण हटवा, अन्यथा कारवाई; खामगाव पालिकेचा इशारा

## दुकानदारांनी दुकानासमोर वाहने व माल ठेवू नये; मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन

प्रतिनिधी १२ मार्च

**खामगाव :** शहरात वाढत्या अतिक्रमणामुळे प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक व्यवस्था विस्कळीत होत असून नागरिकांना दैनंदिन प्रवासात मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासनाने अतिक्रमणधारकांसह शहरातील व्यावसायिकांना तातडीचा इशारा दिला आहे. नगर परिषदेकडून देण्यात आलेल्या सूचनेनुसार, सार्वजनिक रस्ते, पदपथ तसेच मोकळ्या जागांवर करण्यात आलेले अतिक्रमण त्वरित स्वखर्चाने हटवावे. शहरातील अनेक ठिकाणी दुकानदारांकडून दुकानासमोर माल ठेवणे, फूटपाथवर तात्पुरत्या शेड उभारणे तसेच ग्राहकांची वाहने रस्त्यावर उभी राहू देणे, यामुळे वाहतुकीची कोंडी वाढत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर दुकानदारांनी दुकानासमोर माल अथवा वाहने ठेवणे टाळावे आणि रस्ते व पदपथ मोकळे ठेवावेत, असे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे. ज्या नागरिकांनी किंवा व्यावसायिकांनी सार्वजनिक जागांवर अतिक्रमण केले आहे त्यांनी ते तातडीने स्वखर्चाने हटवून नगर परिषदेला सहकार्य करावे. अन्यथा अतिक्रमण आढळल्यास पालिकेमार्फत कारवाई करून ते हटविण्यात येईल. या कारवाईसाठी लागणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल, असा इशारा नगर पालिका मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांनी दिला आहे.

# जिल्ह्यात 'पोकरा' अंतर्गत कृषी अवजार बँकेसाठी आर्थिक सहाय्य; ५ एप्रिलपर्यंत अर्जाचे आवाहन

प्रतिनिधी १२ मार्च

**अमरावती :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या (पोकरा) दुसऱ्या टप्प्यांतर्गत अमरावती जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या आणि महिला बचत गटांना कृषी व्यवसायात भरारी घेण्याची अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. या योजनेतून गावपातळीवर 'कृषी अवजार बँक' स्थापन करण्यासाठी प्रकल्प मूल्यांच्या ६० टक्क्यांपर्यंत म्हणजेच कमाल २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. या उपक्रमासाठी प्रकल्प गावातील उमेद आणि माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच गाव संघ पात्र राहतील, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित गटात वेगवेगळ्या कुटुंबातील किमान १० सदस्य असणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे, ज्या गटांनी यापूर्वी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून कृषी अवजार बँकेचा लाभ घेतला आहे, त्यांना या प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. जर एकाच गावातून एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले, तर लाभार्थींची निवड ऑनलाईन लॉटरी पद्धतीने केली जाईल. प्रकल्पाचे मूल्य २० लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास, राष्ट्रीयकृत बँकेकडून ७५ टक्के कर्ज घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. निवड झालेल्या गटांना ट्रॅक्टर चलित अवजारे, बीबीएफ यंत्र, रोपणी व लावणी यंत्र, मल्चिंग मशीन, कम्बाइन हार्वेस्टर आणि फवारणी पंप यांसारखी आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करता येईल. इच्छुक संस्थांनी प्रकल्पाच्या अधिकृत पोर्टलवर (https://dtb-£dsped.mahapocra.gov ed.in/) ५ एप्रिल २०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करून अर्ज सादर करावेत, असे आवाहन 'आत्मा'च्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

# सज्जनांचे रक्षण, दुष्टांचा विनाश आणि धर्माची संस्थापना यासाठी भगवान श्रीकृष्णाचा जन्म- डॉ. विनोद कोलवाडकर

प्रतिनिधी १२ मार्च

**अमरावती:** भगवान श्रीकृष्णाची दैवी रूपं महाभारतात जागोजागी आढळत असून सज्जनांचे रक्षण करणे, दुष्टांचा विनाश करणे आणि धर्माची संस्थापना करणे यासाठी भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला. महाभारताच्या प्रमाण संहितेत आलेल्या गोष्टींना वाचकांनी महत्त्व द्यावं. कथा, कादंब-यांतून अनेक घटना वस्तुस्थितीला सोडून आल्या असल्यामुळे वाचकांनी तारतम्य राखून महाभारताचं आकलन करावं. महाभारतात द्रौपदी स्वयंवरात कृष्णाचा पहिल्यांदा प्रवेश झालेला आहे. त्या प्रसंगानंतर पडवांशी त्यांचा परिचय झालेला आहे. तेथून पुढे महाभारताचे १८ दिवसांचे युध्द होईपर्यंत भगवान श्रीकृष्णाने वेळोवेळी पांडवांना मार्गदर्शन केले, असे विस्तृत मार्गदर्शन पांच हजारांवर प्रवचनं करणारे डॉ. विनोद कोलवाडकर यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'महाभारतातील कृष्ण' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून दै. हिंदुस्थान वृत्तपत्राचे प्रबंध संपादक तथा विदर्भ साहित्य संघाचे अमरावती शाखा अध्यक्ष श्री विलास मराठे, मराठी विभाग प्रमुख डॉ. मोना चिमोटे उपस्थित होते.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## चोहोट्टा येथील श्रुती भदोलेला राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**कुटासा:** चोहोट्टा बाजार येथील श्रुती दिनेश भदोले हिला व्यवसाय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बद्दल राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोत्ती अभियान (उमेद)च्या साहाय्याने स्वयंसाहायता बचत गटांमुळे अनेकांचे संसार आर्थिकदृष्टी सावरले आहेत. श्रुती दिनेश भदोले हिने सुद्धा मेकअप आर्टिष्ट च्या व्यवसायात उंच भरारी घेतली आहे. तिच्या यशाची दखल घेत समाज प्रतिबंध बहुउद्देशीय संस्था, बी एस एफ बहूद्देशीय संस्थेचा महाराष्ट्र नायक हा राज्यस्तरीय पुरस्कार श्रुती भदोले हिला जाहीर झाला आहे. हा पुरस्कार सोहळा नाशिक येथे चित्रपट श्रृष्टीतील कलाकारांच्या उपस्तितीत पार पडणार आहे.

## वृंदावन गार्डन सोसायटीत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**अकोला:** वृंदावन गार्डन सोसायटीच्या वतीने ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून डॉक्टरेट पदवी प्राप्त केलेल्या सहा कर्तृत्ववान महिलांचा भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामुळे सोसायटीतील महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करत त्यांना समाजासाठी प्रेरणादायी मंच मिळाला. या कार्यक्रमाला प्रसिद्ध नवजात शिशु व बालरोग तज्ज्ञ डॉ. अंजली राजेंद्र सोनोने (संचालिका – सोनोने चाइल्ड केअर अँड क्रिटिकल केअर सेंटर, अकोला) या प्रमुख अतिथी म्हणून लाभल्या होत्या.

## जीण माता मंगलपाठची तयारी सुरू

**अकोला:** जीण सेवा समितीच्या वतीने महानगरात आयोजित भव्य आदिशक्ती जीण माता मंगलपाठची तयारी सुरू करण्यात आली आहे. समितीच्या वतीने आयोजित हा उत्सव सोमवार दि, २३ मार्च रोजी दु २ वाजता स्थानीय न्यू राधाकिसन प्लॉट परिसरातील अग्रसेन भवन येथे होत आहे. यात परतवाडा येथील मंगलपाठकार व गायक कल्पेश शर्मा व प्रीती शर्मा संगीतमय जीण माता मंगलपाठ सादर करणार आहेत. या उत्सवात चुनरी मनोरथ होऊन गजरा, मेहंदी आदी उत्सव होऊन मातेसमोर अखंड ज्योत लावून सव्वामनी भोग व छप्पन्न भोग साकार करण्यात येणार आहे.

## निधन वार्ता

### शैलजा माहोरे



**अकोला :** स्थानिक तापडिया नगरातील सौ. शैलजा सुनील माहोरे यांचे निधन झाले. त्यांचे वय ५० होते. त्यांच्या मागे पती, २ मुली व बराच मोठा आप्तपरिवार आहे. शैलजा या प्राचार्य राजीव सरोदे यांची लहान बहीण आहे.

# रस्त्याच्या कामासाठी मुंडगाववासियांचे आमरण उपोषण

प्रतिनिधी १२ मार्च

### उपोषणामुळे तरी तोडगा निघतो का जनतेचा प्रश्न



**अकोट:** मुंडगाव येथील एकता ऑटो युनियन व गावकऱ्यांनी वणी वारुळा फाटा ते मुंडगाव मार्गे पाथर्डी, तेल्हारा, वरवट या रस्त्याबाबत संबंधित विभागाला वारंवार निवेदने देवून सुद्धा काहीच फायदा झाला नाही. त्यामुळे ११ मार्च पासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

वणी वारुळा फाटा ते मुंडगाव मार्गे पाथर्डी, घोडेगाव, तेल्हारा, माळेगाव, वरवट रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण सार्वजनिक बांधकाम विभाग तेल्हारा कार्यालयामार्फत झाले. बारा बारा मीटर रस्ता तयार केला आहे. काही ठिकाणी काम सुरू आहे. मुंडगाव येथील चंद्रिका नदी पासून जुने बसस्थानक, नवीन बसस्थानक, माउली मंगल कार्यालया पर्यंत अतिक्रमण न काढता अरुंद रस्ता तयार केला. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात रहदारी असून अरुंद रस्त्यावर दररोज लहान मोठे अपघात होत आहेत. मुंडगाव येथील एकता ऑटो युनियन व गावकरी यांनी संबंधित विभागाला वारंवार निवेदने दिली. परंतु उडवाउडवीची उत्तरे मिळाली. या रस्त्याच्या मंजूर अंदाज पत्रकानुसार पंधरा दिवसांत काम सुरू झाले नाही तर उपोषण करू असा इशारा दिला होता. त्यानुसार बुधवार पासून उपोषण सुरू केले आहे. तसेच या कामातील भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी सुद्धा केली आहे.

# सुशिला ढोकणे यांना उत्कृष्ट अंगणवाडी सेविका’ पुरस्कार

प्रतिनिधी १२ मार्च



**अडगांव बु.:** येथील अंगणवाडी सेविका सुशिला नारायण ढोकणे यांनी उत्कृष्ट अगंणवाडी सेविका पुरस्कार’ २०२५-२६ या वर्षाचा पटकावला आहे.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अंगणवाडी सेविका म्हणून काम करताना सुशिलाताईंनी नेहमीच मुलांचे कुपोषण, मातांचे आरोग्य आणि लसीकरण यांसारख्या विषयांवर प्रभावी काम केले आहे. हा पुरस्कार माझ्या एकटीचा नसून माझ्या कामावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक माता भगिनीचा आहे अशी भावना त्यांनी पुरस्कार मिळाल्यावर व्यक्त केली. त्याबद्दल त्यांच्यावर सर्वच स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## वैचारिकदृष्ट्या सक्षमीकरण काळाची गरज : प्राचार्य सविता रोकडे

प्रतिनिधी १२ मार्च



**अकोट:** महिलांनी सक्षमतेने सामोरे जाण्यासाठी महिलांचे वैचारिक दृष्ट्या सक्षमीकरण काळाची गरज आहे. सावित्रीबाई फुले यांना ती आदरांजली ठरेल असे प्रतिपादन प्रा. सविताताई रोकडे यांनी केले. महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ढोकणे भवन मध्ये आयोजित महिला दिन व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. प्रारंभी मंदा बळवंत वानखडे यांनी राजमाता जिजाऊ, वीर अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा बेग व माता रमाई यांच्या प्रतिमांचे पूजन, हारार्पण, द्विप प्रज्वलित व महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन उद्घाटन केले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विश्वस्त मुख्य. कमलताई अढाऊकर तर प्रमुख अतिथी म्हणून विश्वस्त मु. सुमन सोनटक्के, प्रा. हेमलता ताई ढेवले, वंदनाताई करुले, वंदनाताई ढोकणे, जेष्ठ कवयित्री शारदाताई मालपाणी, नीलिमाताई अडोकार, प्राचार्या संगीताताई गोरडे, आश्विनीताई भावे उपस्थित होत्या. याप्रसंगी ठक्रांतीज्योत ठ पुरस्काराने सौ. मंदा वानखडे व प्रा. सविताताई रोकडे यांचा शाल व ठकाव्यगंधठ काव्यसंग्रह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन अरुणाताई लांडे, प्रास्ताविक शालिनीताई बेलसरे तर आभार प्रदर्शन स्वातीताई बोरोळे यांनी केले. जयश्रीताई गणोरकर यांनी स्वागत गीत गायले.

## जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार

प्रतिनिधी १२ मार्च



**अडगाव:** ग्रामीण पत्रकार संघ सामाजिक महिला मंचच्या वतीने महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार झाला.

हा कार्यक्रम कांचन रिसोर्ट येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. शोभाताई देशमुख उपस्थित होत्या तर प्रमुख अतिथी प्रीतीताई देशमुख (प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जि.प. अमरावती), डॉ. अनुभूती पाटील (स्त्रीरोग तज्ञ), राजश्री जढाळे (संचालक, महात्मा फुले अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक), सुरेखा लुंगारे (नगरसेविका), मनोहर सुने राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, कैलासबापू देशमुख राष्ट्रीय संघटक तथा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, युसुफभाई खान राष्ट्रीय कार्याध्यक्ष अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, अक्षरा लहाने नगर सेवक अचलपूर उपस्थित होत्या.

यावेळी डॉ. माया बोरखडे, हर्षा ढोक (क्रीडा क्षेत्र), कांचन उल्हे (उद्योग क्षेत्र), वैशाली बरडे (उद्योग क्षेत्र), कविता घाटोळ (उद्योग क्षेत्र), कांता काळे (आरोग्य सेवा), कविता बोंडे (समुपदेशक), मीनाताई राहिंज अहिल्या नगर (पत्रकारिता), आदित्य मेहता (नृत्यकला), श्रुतिका तायडे (उद्योग क्षेत्र), प्रा. डॉ. मंजुषा सागर वडकी यवतमाळ (शिक्षण क्षेत्र), गौरी सतके (गायन), सुयोगा संतापे (लेखन) अलकाताई तल्हार (सहाय्यक कृषी अधिकारी) टोंगलाबाद यांना कृषी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ॲड. पूनम झवर व माधुरी शर्मा ह्यांचा सन्मान, सत्कार करण्यात आला तर

दिनेश भटकर (वरिष्ठ यंत्रचालक) वितरण विभाग सर्फापूर यांनी ३० वर्ष सेवा देऊन निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सहपतनिक सन्मान करण्यात आला आहे. तसेच राजेंद्र जढाळे (पोलीस उपनिरीक्षक) यांनी पोलीस खात्यातून निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमांमध्ये अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ महिला मंच कडून महिला मंच प्रदेशाध्यक्ष

## सावरा प्राथमिक केंद्रांतर्गत आरोग्य उपकेंद्रातील रिक्त पदांचा रूग्णांना फटका

प्रतिनिधी १२ मार्च

### उपचारांअभावी ग्रामीण जनतेची फरपट



**अकोट:** सावरा प्राथमिक आरोग्य केंद्र मार्फत येणाऱ्या उपकेंद्रामध्ये जवळपास ११ पदे रिक्त आहे तसेच एका आरोग्य उपकेंद्रावर समुदाय आरोग्य अधिकारी हे देखील पद रिक्त आहे. त्याचा परिणाम हा रुग्णसेवर तसेच लसीकरणावर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

सावरा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे देखील ४ पदे ही रिक्त आहेत अधिकाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे प्रशासकीय कारणाने ही पदे रिक्त झाली आहे आणि त्या पदांचा अतिरिक्त प्रभार हा दुसऱ्या कर्मचाऱ्यांकडे देण्यात आला आहे पण त्या कर्मचाऱ्यांनी त्यांची उपकेंद्र सांभाळायची इतकी दुसरी उपकेंद्र सांभाळायचे आहेत हा प्रश्न जनतेला पडला आहे.

सावरा प्राथमिक आरोग्य केंद्र हा महत्त्वाचा रुग्णांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे सेंटर समजल्या जाते या आरोग्य केंद्राचा कारभार खारपान पट्टया पासून तर आदिवासींच्या पट्ट्यापर्यंत सातपुड्याच्या पायथ्याशी आदिवासी नागरिकांच्या जीवाची जबाबदारी या मुख्य केंद्रावर येऊन ठेवली आहे, केंद्राच्या भरोशावर अंदाजे २६ गावांचा हजारोच्या संख्येने रुग्णाच्या वाढत्या संख्येचा भार हा आरोग्य केंद्रावर अवलंबून आहे, पण येथील अपुऱ्या स्टॉप मुळे रुग्णांची गैरसोय होत आहे.

ग्रामीण भागातील जनतेला स्थानिक पातळीवर तातडीने आरोग्य सेवा मिळावी यासाठी शासनाने गावोगावी आरोग्य उपकेंद्रे (हेल्थ सब सेंटर) उभारली आहेत, मात्र सध्या या उपकेंद्रामध्ये आरोग्य सेवक आरोग्य सेविका आणि औषध उपचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा ‘व्हेंटिलेटरवर’ असल्याचे चित्र आहे.

अपघात किंवा सर्पदंशासारखा आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार न मिळाल्याने रुग्णांचा जीव धोक्यात येत आहे लसीकरण खोळंबले आरोग्य सेविकांची पदे रिक्त असल्याने बालकांच्या नियमित लसीकरण मोहिमेत खंड पडत आहे.

**संदीप धर्माळे**
प्रभारी सरपंच, बांबर्डी

ग्रामीण जनतेचे आरोग्य धोक्यात येऊ नये यासाठी शासनाने तात्काळ कायमस्वरूपी पदभरती करून उपकेंद्रांना सक्षम करावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल.

**केशव बिलबिले,**
वंचित बहुजन आघाडी

आयुष्यमान आरोग्य मंदिर सावरा येथील काही पद हे प्रशासकीय कारणाने रिक्त झाल्याने त्या ठिकाणी पर्यायी स्वरूपात अतिरिक्त प्रभार हा देण्यात आला आहे. येत्या कालावधीत नियमित स्वरूपात कर्मचारी यांची नियुक्ती केली जाईल.

**प्रवीण चव्हाण**
अकोट ता.आ. अधिकारी,

## वडाळी देशमुख पंढरीनाथ संस्थानात शिव महापुराण कथेचे आयोजन

प्रतिनिधी १२ मार्च



**अकोट:** श्री संत चतुर्भुज महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत श्री एकनाथ षष्ठी निमित्त श्री शिव महापुराण कथेचे आयोजन केलेले आहे तरी प्रभू प्रेमी व सज्जन गावकरी मंडळींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा शिव महापुराण कथेचे प्रारंभ सोमवार ९ ते सांगता सोमवार १६ असून कार्यक्रमाची रूपरेषा काकडा सकाळी ६ ते ७, ९ ते १२, व ३ ते ५ हरिपाठ ६ ते ७ हरी किर्तन ९ ते ११ असून कथावाचक ह भ प ज्ञानेश्वर महाराज गई संतनगरी शेगाव यांच्या सु मधुर वाणीतून होणार आहे,

सप्ताह मधील नामवंत कीर्तनकार सोमवार ९ ह भ प ज्ञानेश्वर महाराज कोल्हे चंडिकापूर, मंगळवार १० हभप अनुप महाराज वानखडे घाटपुरी खामगाव, बुधवार ११ ह भ प धीरज महाराज चांदुरकर इतकी अंतरगाव, गुरुवार १२ ह भ प अच्युत महाराज बोर्डी निंबारी धोटे हनुमान सेवक, शुक्रवार १३ ह भ प केशव महाराज मोरे म्हैसपुर, शनिवार १४ ह भ प अविनाश महाराज कडू चौसाळा, रविवार १५ ह भ प गजानन महाराज देठे शिवचरित्रकार जालना, सोमवार १६ ह भ प ज्ञानेश्वर महाराज गई यांचे काल्याचे किर्तन व सकाळी ९ ते १२ व नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे,

सप्ताह मधील अन्नदाते निलेश देठे, गोविंद देशमुख, अन्सारअली देशमुख, अजित देशमुख, विकी बारब्दे, प्रसाद वानखडे, प्रमोद लहाने, मृदुंगाचार्य अजब आंबोरे, नंदकिशोर हाडोळे गायनाचार्य श्रीकृष्ण पिंपळे, गणेश चांदूरकर प्रफुल्ल रोंगे मंगेश अंभोरे विणेकरी सुधाकर देठे, ऑर्गन वादक गजानन भिसे प्रमुख उपस्थिती ह भ प जगन्नाथ हाडोळे, ह भ प रमेश पळसकर, ह भ प ज्ञानेश्वर भुस्कट, ह भ प बापूराव काळे, कीर्तनासाठी टाळकरी विनोद टोहरे, रवींद्र हाडोळे, विठ्ठल भांडे, आशिष हुशे, सुदर्शन रायबोले, बंडूभाऊ शेगोकार, श्रीकृष्ण लोखंडे, बंडूभाऊ हुसे, ऋषिकेश अंबोरे, लक्ष्मण फुकट, यांची उपस्थिती सप्ताह मध्ये राहणार आहे भजन मंडळी श्री विठ्ठल रुक्मिणी महिला भजन मंडळ श्री गजानन महाराज पुरुष भजनी मंडळ श्री संत चतुर्भुज महाराज महिला पुरुष भजनी मंडळ व बुद्धेश्वर महाराज भजनी मंडळ, शिव महापुराण कथेचे आयोजक श्री विठ्ठल रुक्मिणी महिला भजन मंडळ श्री हनुमान नवदुर्गा उत्सव मंडळ व समस्त गावकरी मंडळी वडाळी देशमुख यांच्याकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## कालंका माता मंदिरातील दागिने चोरीचा गुन्हा उघड; ७.२१ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १२ मार्च

**अकोट:** अकोट शहरातील बहुचर्चित कालंका माता मंदिरातील दागिने चोरी प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अखेर उलगडा केला असून सुमारे ७ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी अकोट शहर पोलीस ठाण्यात फिर्यादी चंद्रशेखर भिमराव गावंडे (रा. अकोट) यांनी तक्रार दिली होती. अज्ञात चोरट्याने बारगण येथील कालंका माता मंदिरातून देवीच्या मूर्तीवरील ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने, ७५० ग्रॅम चांदीचे दागिने तसेच दानपेटीतील १५ हजार रुपये रोख असा एकूण ४ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची तक्रार करण्यात आली होती.

या प्रकरणी अकोट शहर पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक २४४/२०२६ अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान हा गुन्हा अमोल काशीराम तेलगोटे (वय ३९, रा. रिधोरा ता. बाळापूर जि. अकोला) याने केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपीचा शोध घेत असताना पोलिसांचे पथक छत्तीसगडमधील रायपूर येथे गेले होते. तांत्रिक तपासातून मिळालेल्या माहितीनुसार परतीच्या प्रवासात अमरावतीजवळ आरोपीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीकडून सोन्याच्या अंगठ्या, सोन्याची लगड, चांदीची बिस्किटे, चांदीचे कडे, मोबाईल फोन, दागिने वितळविण्याचे साहित्य, हायड्रॉलिक कटर तसेच बजाज पल्सर मोटारसायकल असा एकूण ७,२१,०६८ रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.

तपासात आरोपी चोरी करताना स्वतःचा मोबाईल बंद ठेवत असे तसेच चोरीसाठी विनानंबरच्या मोटारसायकलीचा वापर करत होता. चोरी केलेले दागिने ओळख पटू नयेत म्हणून तो स्वतःच ते वितळवून त्यांना दुसरा आकार देत असल्याचेही समोर आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, पोउपनि विष्णू बोडखे, गोपाल जाधव, माजिद पठाण तसेच पोलीस कर्मचारी सुलतान पठाण, वसीमुद्दीन, एजाज अहमद, महेंद्र माळी, भास्कर धोत्रे, अन्सार अहमद, राज चंदेल, सतीश पवार, करण मानकर, अभिषेक पाठक, भीमराव दिपके, अशोक सोनवणे, राहुल गायकवाड यांनी केली.

## ‘महाबीज’ तर्फे सामाजिक उत्तरदायित्व निधीतून १० शाळांना ग्रंथसाहित्य भेट

प्रतिनिधी १२ मार्च

### जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते वितरण



**अकोला:** महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळातर्फे सामाजिक उत्तरदायित्व निधीतून जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १० शाळांना ग्रंथालयांसाठी विविध विषयांची पुस्तके आणि दर्जेदार कपाट अशा वाचन साहित्याचे वितरण जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते करण्यात आले.

महाबीजभवनात हा कार्यक्रम झाला. महाबीजचे संचालक वल्लभराव देशमुख, डॉ. रणजीत सपकाळ, उपजिल्हाधिकारी तथा महाव्यवस्थापक प्रशासन डॉ. संजय गरकल, कंपनी सेक्रेटरी विनय वर्मा, डॉ. जितेंद्र काठोळे यांच्यासह महामंडळाचे सर्व विभागप्रमुख आणि संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

डिजीटल युगात विद्यार्थ्यांचा कल स्क्रीनकडे वाढत असताना त्यांना पुन्हा पुस्तकांकडे वळवणे काळाची गरज आहे. या ग्रंथालयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य उपलब्ध होईल व त्यामुळे त्यांच्या ज्ञानात भर पडेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी केले.

**गुणवत्ता वाढीसाठी पुस्तकांचे महत्त्व**

महाबीजच्या संचालकांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांची वाचन क्षमता विकसित करणे आणि त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा आहे. केवळ अभ्यासक्रमाची पुस्तके न वाचता अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो आणि त्यांची कल्पनाशक्ती विस्तारते. या पुस्तकांचा उपयोग शाळांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रभावीपणे करावा, अशी अपेक्षाही यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.

**‘निवडक शाळांची निवड’**

जिल्ह्यातील ज्या शाळांमध्ये वाचन साहित्याची कमतरता होती, अशा जिल्हा परिषदेच्या १० शाळांची या उपक्रमासाठी विशेष निवड करण्यात आली. वितरीत करण्यात आलेल्या वाचन साहित्यामध्ये कथा, कादंबरी, सामान्य ज्ञान, थोर पुरुषांची चरित्रे आणि स्पर्धा परीक्षांना उपयुक्त अशा विविध पुस्तकांचा समावेश आहे. महाबीजच्या या स्तुत्य उपक्रमाचे शैक्षणिक क्षेत्रातून कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.जितेंद्र काठोळे आणि आभार विनय वर्मा यांनी मानले.

## जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येतेकी, अर्जदार श्री. शंकर सेवाराम राठोड रा. वसंतवाडी, ता. जि. वाशिम, यांनी मौजे एकांबा येथील गट नं. 113 अ मधील क्षेत्र 0.40 हे. आर. या जमिनीतील 7/12 मधील इतर अधिकारातील साधे कुळ या रकान्यात काळु दिपला हि कुळाची नोंद कमी करण्यात यावी असा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्यावरून प्रकरण सुरु करण्यात आले.

तरी सदर प्रकरणात मौजे एकांबा येथील गट नं. 113 अ मधील 0.40 हे. आर या जमिनीतील 7/12 मधील इतर अधिकारातील साधे कुळ या रकान्यात काळु दिपला हि कुळाची नोंद कमी करून मिळणेबाबत प्रकरणात कोणचे आक्षेप व हरकती असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून 15 दिवसाचे आत सादर करावेत मुदतीत प्राप्त न झालेल्या आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व प्रकरणात योग्य तो आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**ठिकाण:** 13.2.2026
**ठिकाण:** वाशिम

**(निलेश पळसकर)**
**तहसिलदार, वाशिम**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. १२ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आर्णी बाजार समितीत शेतकऱ्यांचा सत्कार

प्रतिनिधी १२ मार्च

**आर्णी :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत चणा खरेदीला नाफेडने सोमवारी (९ मार्च) सुरुवात केली आहे. बाजार समितीचे सभापती अनिल आडे, उपसभापती परशराम राठोड यांच्या हस्ते खरेदीला सुरुवात करण्यात आली. शेतकरी सुनील मांडेकर यांनी आणलेल्या चन्याची पूजा करून खरेदी सुरू केली. शेतकऱ्याला शेला, नारळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रती क्विंटल ५८७५ रुपये दर देण्यात आला. याप्रसंगी संचालक तुकाराम आडे, राजू बुटले, उमेश कोठारी, दीपक बुटले, गणेश राठोड, अजय गादेवार, संतोष चौधरी, गफूर शहा, शीतल चौधरी, आर्णी बाजार समितीचे सचिव विशाल राठोड आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जिल्हा परिषदचा 34 कोटींचा अर्थसंकल्प सादर



प्रतिनिधी १२ मार्च

**यवतमाळ :** ग्रामीण विकासाला चालना देत शेती, शिक्षण, सामाजिक कल्याण आणि डिजिटल प्रशासनावर विशेष भर देणारा सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठीचा जिल्हा परिषद यवतमाळचा ३४ कोटी ०९ लाख रुपयांचा स्वनिधीचा मुळ अर्थसंकल्प गुरुवारी सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी हा अर्थसंकल्प सभागृहात सादर केला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुकाराम भिसे आणि उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी सीमा काळे उपस्थित होते.

सादर केलेल्या अर्थसंकल्पात जिल्हा परिषदेचे स्वउत्पन्न वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला असून त्यासाठी भौतिक मालमत्ता निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यवतमाळ शहरातील जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयासमोरील जागेवर उभारण्यात येणारे दुमजली दुकान गाळे चालू आर्थिक वर्षात पूर्ण होणार आहेत. तसेच वणी येथील पंचायत समितीच्या मुख्य बाजारपेठेतील जागेवरही दुकान गाळ्यांचे बांधकाम सुरू असल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा परिषद प्रशासनाने डिजिटल गव्हर्नन्सच्या दिशेनेही मोठे पाऊल टाकले असून कार्यालयीन कामकाज पूर्णपणे ई-ऑफिस प्रणालीद्वारे करण्यावर भर दिला आहे. या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक, सुलभ आणि गतीमान करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. येत्या वर्षातही डिजिटल सुधारणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याची योजना आहे.

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसंकल्पात ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीच्या माध्यमातून गावांच्या सामाजिक, आर्थिक आणि भौतिक विकासाशी संबंधित आठ प्रमुख मुद्द्यांवर काम करण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शाळांमधील भौतिक सुविधा वाढविण्यासाठी शिक्षण विभागासाठी २ कोटी ५२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 'निपुण भारत' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच विज्ञान प्रदर्शनासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्हा कृषीप्रधान असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ करण्यासाठी कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी २ कोटी ७४ लाख २० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर स्पायरल सेपरेटर, ७० टक्के अनुदानावर इलेक्ट्रिक मोटर पंप, तसेच ग्रामनिहाय ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्यासाठी ९० टक्के अर्थसहाय्य देण्याची योजना आहे. याशिवाय शेतजमिनीला तारकुंपण आणि पेरणी यंत्र उपलब्ध करून देण्याच्या योजनाही राबविण्यात येणार आहेत. समाजकल्याण विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सायकल योजना, स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तके आणि साहित्य उपलब्ध करून देणे, तसेच शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचन संच देण्याची योजना आहे. दिव्यांग मुलांसाठी कॉक्लिया इम्प्लांट मशिनच्या देखभालीसाठी अर्थसहाय्य तसेच क्रीडा प्रशिक्षणाचेही नियोजन करण्यात आले आहे.



महिला व बालविकास विभागामार्फत महिलांसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जाणार असून महिलांना रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण तसेच जीवन कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अंगणवाडीमार्फत गर्भवती व स्तनदा माता तसेच कुपोषित बालकांना अतिरिक्त आहार पुरविण्याची योजना कायम ठेवण्यात आली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना आणि राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यात हजारो घरकुलांची उभारणी सुरू आहे. या कामांना गती देण्यासाठी उत्कृष्ट ग्रामपंचायतींना ३० लाख रुपयांपर्यंत आणि उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना १२ लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर बक्षिसांची तरतूद करण्यात आली आहे.

याशिवाय जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कार्यालयांचे नूतनीकरण, वाहनतळ उभारणी, कॅन्टीन बांधकाम, तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा भवनाचा विस्तार यांसारखी विविध विकासकामेही हाती घेण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी सांगितले.

# दहावीचा सायन्स पेपर फुटल्याची चर्चा

## उमरखेडमध्ये पालक व विद्यार्थ्यांत चिंतेचे वातावरण

प्रतिनिधी १२ मार्च



**उमरखेड :** राज्य शिक्षण मंडळाकडून इयत्ता १० वी व १२ वीच्या बोर्ड परीक्षा सध्या सुरू असून या परीक्षा कॉपीमुक्त व पारदर्शक पद्धतीने घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र या आदेशांची अंमलबजावणी प्रत्यक्षात कितपत काटेकोरपणे होत आहे, याबाबत शिक्षणप्रेमी व पालकवर्गातून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, उमरखेड शहरातून एक खळबळजनक आणि गंभीर माहिती समोर येत आहे. आज सुरू असलेल्या दहावीच्या बोर्ड परीक्षेतील विज्ञान (सायन्स) विषयाचा पेपर काही विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर फिरत असल्याची चर्चा पसरली आहे. विशेष म्हणजे परीक्षा सुरू असताना सकाळी ११ वाजून २४ मिनिटांच्या सुमारास हा पेपर मोबाईलवर पाहायला मिळाल्याचे सांगितले जात आहे.

यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. परीक्षा सुरू असताना पेपर मोबाईलवर कसा पोहोचला? परीक्षा केंद्रांवर मोबाईलवर बंदी असताना पेपर बाहेर कसा गेला? या प्रकारामागे नेमके कोणाचे हात आहेत? विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवणाऱ्या या महत्त्वाच्या परीक्षेत जर पेपर मोबाईलवर फिरत असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर मानला जात आहे. या संदर्भात परीक्षा व्यवस्थापनाबाबत प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हा प्रकार खरा असल्यास संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होण्याची भीतीही पालकांकडून व्यक्त केली जात आहे. यामुळे या प्रकरणाची तात्काळ व सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. उमरखेडमधील पालक, विद्यार्थी व नागरिकांचा एकच सवाल आहे. खरोखर सायन्सचा पेपर लीक झाला आहे का? प्रशासन यावर कोणती कारवाई करणार? तसेच उमरखेड तालुक्यातील इतर परीक्षा केंद्रांमध्येही असे प्रकार घडले आहेत का, याचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी, यवतमाळ यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालकवर्गाकडून होत आहे.

# 'रस्ता नाही, तर टोल कशाचा?'

## महाविकास आघाडीचा हल्लाबोल; टोलनाक्याची तोडफोड

प्रतिनिधी १२ मार्च

**यवतमाळ :** दारव्हा ते कारंजा मार्गावरील भुलाई-भांडेगाव परिसरातील टोलनाका बेकायदेशीर असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी आक्रमक आंदोलन छेडत टोलनाक्याची तोडफोड केली. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

महाविकास आघाडीच्या वतीने २ मार्च २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, दारव्हा यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यवतमाळ तसेच मुख्यमंत्री यांना निवेदन देत दारव्हा–कारंजा मार्गावरील टोलनाका तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यानंतर संतप्त कार्यकर्त्यांनी दारव्हा–कारंजा रोडवरील भुलाई-भांडेगाव येथील टोलनाक्यावर धडक देत तेथील संरचनेची तोडफोड केली आणि टोलनाका बंद पाडला. या वेळी आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत "रस्ता नाही, टोल कशाचा?" असा सवाल उपस्थित केला.





दारव्हा तालुक्यातील २० ते ३० किलोमीटर परिसरातील खेड्यांतील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व वाहनधारकांना या टोलनाक्यावर अतिरिक्त टोल भरावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली. दिग्रस–दारव्हा–कारंजा (भांडेगावपर्यंत) सुमारे ४८ किलोमीटरच्या रस्त्यासाठी टोल मंजूर करण्यात आला आहे. मात्र दिग्रस ते दारव्हा हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा पूर्ण झाला असला तरी दारव्हा ते कारंजा (भांडेगावपर्यंत) या मार्गावर अद्याप कोणतेही काम झाले नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

दरम्यान, या प्रकरणाची दखल घेत जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी आंदोलनकर्त्यांची बैठक बोलावली असून या बैठकीत टोलनाका संदर्भातील मुद्द्यांवर चर्चा होणार असल्याची माहिती आंदोलकांकडून देण्यात आली आहे.

### आंदोलनकर्त्यांचा इशारा

■ दारव्हा–कारंजा मार्गावरील टोलनाका तात्काळ कायमस्वरूपी बंद करावा, अन्यथा यापेक्षाही उग्र आंदोलन छेडण्यात येईल. या रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण असून नागरिकांवर अन्यायकारक टोल आकारला जात आहे.
- राहुल ठाकरे, माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद यवतमाळ

■ खळखट्याक आंदोलन म्हटले की पूर्वी शिवसेना किंवा मनसे यांची शैली म्हणून ओळखली जात होती. मात्र आता महाविकास आघाडीतील घटक पक्ष कॉंग्रेसही आक्रमक आंदोलनाच्या मार्गावर येताना दिसत आहे. नुकत्याच दिल्लीतील AI समिटदरम्यान युवा कॉंग्रेसने अर्धनग्न आंदोलन करत देशभरात खळबळ उडवून दिली होती. दारव्हा येथील टोलनाका प्रकरणानेही त्याच आक्रमक राजकीय शैलीची झलक पाहायला मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# नव्या पिढीसाठी आंबेडकरी विचारांची मशाल जिवंत ठेवण्याची गरज – डॉ.रेखा मेश्राम

## नेर येथे दुसरे वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलन उत्साहात

प्रतिनिधी १२ मार्च



**यवतमाळ :** स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर उभी असलेली आंबेडकरी चळवळ ही सामाजिक परिवर्तनाची सशक्त परंपरा आहे. या परंपरेत प्रा. सतेश्वर मोरे यांचे साहित्य व कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे, असे मत दुसऱ्या वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलनाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. रेखा मेश्राम यांनी व्यक्त केले. त्या नेर येथे आयोजित संमेलनात अध्यक्षीय भाषण करत होत्या. संमेलनाचे उद्घाटन दलित पँथरचे संस्थापक सदस्य व आंबेडकरी साहित्यिक ज. वी. पवार यांच्या हस्ते झाले.

प्रा. मेश्राम यांनी आपल्या भाषणात तथागत गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि माता रमाई यांच्या कार्याला अभिवादन केले. तसेच आंबेडकरी चळवळीतील अभ्यासक, लेखक व कवी प्रा. सतेश्वर मोरे यांच्या स्मृतींनाही त्यांनी आदरांजली वाहिली.

विदर्भात सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक पातळीवर विविध चळवळी समांतरपणे सक्रिय होत्या. फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची चळवळ, बहुजनवादी चळवळ, डाव्या विचारसरणीची चळवळ, सत्यशोधक चळवळ तसेच बौद्ध धम्म चळवळ या सर्वांचा समाजावर प्रभाव दिसून येत होता. या चळवळींमध्ये मतभेद असले तरी त्यांचा समान धागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी जोडलेला होता, असे त्यांनी नमूद केले.

प्रा. सतेश्वर मोरे हे दलित पँथर चळवळीपासून प्रेरित निष्ठावंत कार्यकर्ते होते. विद्यार्थीदशेपासून त्यांनी आंबेडकरी विचारांशी बांधिलकी ठेवत सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. बडनेरा येथील आर. डी. आय. महाविद्यालयात त्यांनी २५ वर्षे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्य केले. तसेच नागपूर युनिव्हर्सिटी टिचर्स असोसिएशनचे सहसचिव म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली, अशी माहिती प्रा. मेश्राम यांनी दिली.

साहित्य क्षेत्रात त्यांनी 'बाई', 'शंबूक', 'मी मांग नाही' आणि 'स्वातंत्र्य एक प्रश्नचिन्ह' यांसारखी पथनाट्ये तसेच सामाजिक प्रश्नांवर आधारित अनेक कविता लिहिल्या. 'मेजर', 'दंगल', 'नातं पावसाचं नि माझं', 'माझं पहाडपण' आणि 'शिकारी पाखरं आणि माझी पावलं' या कवितांमधून त्यांनी आंबेडकरी साहित्याला नवे परिमाण दिले, असेही त्यांनी सांगितले. प्रा. मोरे यांनी हजाराहून अधिक व्याख्यानांमधून सामाजिक प्रश्नांवर परखड भूमिका मांडली. अन्याय आणि चुकीच्या प्रवृत्तींविरुद्ध त्यांनी नेहमीच ठामपणे आवाज उठविला. त्यांच्या लेखनात सामाजिक परिवर्तनाची ज्वाला स्पष्टपणे दिसून येते, असे मेश्राम म्हणाल्या.

यावेळी विदर्भातील महिलांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेत समाजपरिवर्तनाच्या लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे त्यांनी सांगितले. तुळसाबाई बनसोडे, जाईबाई चौधरी, अंजनाबाई देशभ्रतार, सुलोचनाबाई डोंगरे, रत्नकलाबाई मकेसर यांसारख्या महिलांनी समाजजागृतीसाठी उल्लेखनीय कार्य केले, असेही त्यांनी नमूद केले. प्रा. सतेश्वर मोरे यांचे कार्य आणि विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्या साहित्याचे संकलन व प्रकाशन व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनिता मोरे व महादेव घरडे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. जगदीश पाटील यांनी तर आभार प्रदर्शन राजेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला समता सैनिक दलातर्फे अध्यक्ष, उद्घाटक व उपस्थित मान्यवरांना सलामी देण्यात आली. वनिता बहुउद्देशीय ग्राम उद्योग महिला मंडळ, प्रज्ञाशोध आंबेडकरी विचार मंच आणि प्रज्ञाशोध सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संमेलनाचे मुख्य संयोजक डॉ. शरद मोरे, महादेव घरडे, ऋषभ मेश्राम, आदेश पाटील, अनुप भिमटे, पपीता पाटील, जोशना खडसे, रेखा इंगोले यांनी परिश्रम घेतले.

# महामार्गावरुन जनावरे, गुटखा व अंमली पदार्थांची तस्करी

प्रतिनिधी १२ मार्च

**महागाव :** नागपूर–बोरी–तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गावरून रात्रीच्या वेळी जनावरे, गुटखा तसेच अंमली पदार्थांची वाहतूक होत असल्याची चर्चा परिसरात होत आहे. या प्रकाराची माहिती संबंधित यंत्रणांना असूनही प्रभावी कारवाई होत नसल्याबद्दल नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

नांदेड विभागाच्या महामार्ग पोलिसांची कोसदनी येथे चौकी असून येथे पोलीस कर्मचारी वाहन तपासणीसाठी तैनात असतात. दुचाकी तसेच जड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करतानाही ते दिसून येतात.

मात्र काही नागरिकांच्या मते, रात्रीच्या वेळी महामार्गावरून जाणाऱ्या संशयित वाहनांची तपासणी अधिक कडकपणे होण्याची गरज आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, तेलंगणा राज्याच्या सीमेकडून काही वाहनांद्वारे गुटखा तसेच इतर प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक होत असल्याच्या चर्चा आहेत. तसेच काही भागांतून जनावरांचीही अवैधरित्या वाहतूक होत असल्याचे सांगितले जाते. आर्णी येथून धनोडा, हिवरा, फुलसावंगी, महागाव, उमरखेड व ढाणकी या मार्गाने काही वाहने जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी महामार्गावरील तपासणी अधिक कडक करून संशयित वाहनांची तपासणी करावी व नियमभंग आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच जिल्हा पोलीस प्रशासनाने या प्रकरणाकडे लक्ष देऊन विशेष पथकाद्वारे तपासणी मोहीम राबवावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

# दोन रेतीचे टिप्पर कारवाई न करता सोडले

## महसूल प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्न

प्रतिनिधी १२ मार्च



**उमरखेड :** उमरखेड तालुक्यात अवैध रेती वाहतुकीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. महागाव रोडकडून शहरात येणारे रेतीने भरलेले दोन विनानंबर टिप्पर गायत्री चौकातील माहेश्वरी पुतळ्याजवळ थांबविण्यात आले होते. मात्र काही वेळानंतर कोणतीही कारवाई न करता ते सोडण्यात आल्याची चर्चा शहरात होत आहे.

ही घटना ८ मार्च रोजी दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास घडल्याची माहिती मिळत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित महसूल कर्मचाऱ्याने तपासणीसाठी टिप्पर थांबविले होते. मात्र काही वेळ चर्चेनंतर दोन्ही वाहने पुढे जाऊ देण्यात आली. दरम्यान, उमरखेड तालुक्यात रेती वाहतुकीचा प्रश्न सातत्याने पुढे येत आहे. पैनगंगा नदीपात्रातून अवैधरित्या रेती उत्खनन करून ट्रॅक्टर व टिप्परद्वारे वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या आहेत. काही वाहने विनानंबर प्लेटने शहरातून व ग्रामीण भागातून वाहतूक करत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित घटनेची चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी आणि नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

प्रतिनिधी १२ मार्च



**पुसद :** येथील प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव प्रबोधनपर्व आयोजन समितीच्या वतीने वसंतराव नाईक चौकातील प्रबोधनपर्व कार्यालयात दि. १० मार्च रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना स्मृतिदिनी अभिवादन केले.

यावेळी सर्वप्रथम समितीचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. यादवराव जांभुळकर यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. तसेच सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षण व समाजजागृतीसाठी केलेल्या कार्याचा गौरव करून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. या कार्यक्रमास प्रबोधनपर्व आयोजन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण कांबळे, विठ्ठल खडसे, अ‍ॅड. विश्वास भवरे, गणपत गव्हाळे, पांडुरंग व्यवहारे, दादाराव अगमे, प्रा. कल्याण साखरकर, प्रा. अंबादास वानखेडे, राजेंद्र नाईक, अविनाश भवरे, दिपक कांबळे, भगवान हनवते, माजी अध्यक्ष संतोष अंभोरे, महेश निखाते, भास्कर बनसोड, गुरु उचाडे, नितेश खंदारे, अमर पाटील आदी समाजबांधव व पदाधिकारी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि. १२ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पोलिसासमोर झुकला जनतेसमोर नाही वाकला



### वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगमधील...

# दादागिरी थांबविणे काफी, मग्रूर ठेकेदाराने मांगितली माफी !

## कारण नसतांना, सीसीटीव्ही कॅमेरे असतांना, पैसे देवूनही त्रास विनाकारण

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशनवर काहीच कारण नसतांना सिसीटीव्ही कॅमेरे असतांना पार्कींगचे पैसे देवूनही पार्किंगमध्ये ठेकेदाराची दादागिरी दररोज वाढत आहे. या ठेकेदारासोबत रेल्वे अधिकाऱ्यांची भागिदारी असल्यामुळे आपले कोणची काही करू शकत नसल्याने तो मग्रूर ठेकेदार प्रवाशाना अश्लिल भाषेत महिलांसमोरच शिवीगाळ करून मारहाणीची भाषा करतो, या सर्व प्रकाराला वाशीम शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्याच्या आरेरावीचा व दादागिरीचा पोलिसांना शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला होता. या सर्व प्रकाराची सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी सिटी न्युज चॅनलने वृत्त लावून धरून पाठपुरावा केला. त्यामुळे पोलिसांनीच या मग्रूर ठेकेदाराविरूध्द गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर पोलिसांनी फरार ठेकेदाराला पोलिसांनी ताब्यात घेवून माफी मागायला लावली. मात्र, या मग्रूर ठेकेदाराने पोलिसांची तर माफी मांगितली मात्र जनतेची अद्यापही माफी मांगीतली नाही. तरी सुध्दा दादागिरी थांबविणे हेच काफी आहे यानंतर जनतेला त्रास देवू नये हिच जनतेची माफक अपेक्षा आहे. पुन्हा दादागिरी केल्यास सिटी न्युजसह जनताही रस्त्यावर उतरेल.



### सिटी न्युज सुपरफास्टचा सततचा पाठपुरावा...

७ ते ८ वर्षापासून कारण नसतांना पार्कींगचे पैसे देवूनही विनाकारण महिलांसमोर अश्लिल शिवीगाळ करून दादागिरी करणाऱ्या मग्रुर ठेकेदाराला वाशीमचे नागरिक त्रस्त झाले होते. या संबंधिचे सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी न्युजने वृत्त प्रकाशित करून जनतेच्या भावनेला वाचा फोडली. या प्रकरणाची १३ वृत्ताची वृत्त मालिका लावून धरली. त्यामुळे तीन दिवसापासून दररोज हजारो फोन सिटी न्युज सुपरफास्टला येत असून धन्यवाद देत आहेत. त्यामुळे जनतेच्या न्यायासाठी जनतेसोबत सिटी न्युज सुपरफास्ट कायम सोबत आहे आणि सोबत राहणार आहे.

### यांनी केल्या तक्रारी....

ग्राहक पंचायतचे अध्यक्ष, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष, डी.आर.यु.सीसीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी, झेड.आर.यु. सीसीचे सदस्य सुरज चौधरी, प्रविण जाधव, शंकरराव इंगोले, गणेश पाथे, काशिनाथ शिंदे, सिध्दार्थ धाबे, किसन इंगोले, दिपक पांढरे, दिपक शिंदे, शुभम सोळंके, विठ्ठल मोरे, शुभम थोरात, संतोष खडसे, संतोष वानखेडे, सागर अगम, भारत घुगे, जयदेव इंगळे, राजु टोकळे, सुनिल गुडदे, हमीद बेनिवाले यासह शेकडो सामाजिक संघटनांनी व त्रस्त प्रवाशांनी तक्रार केली आहे. या प्रकरणी सर्वप्रथम प्रविण जाधव पाटील या युवकाने व्हिडीओ काढून व्हायरल केला होता. व या प्रकरणाचा पाठपुरावा केला.

माणुसकी नावाचा काही प्रकार असतो. चांगल्या बोलण्याने वागल्याने माणुस पैशाकडेही पाहत नाही रेल्वे स्टेशनच्या परिसरात गाडी आल्यापासुन मोठ्या आवाजात दादागिरीने बोलुन लोखंडी रॉड घेऊन मारण्याच्याच हेतुने ठेकेदार उभा असतो प्रेमाने काहीच बोलत नाही. घाण घाण शिवीगाळ करत गाडी पार्कींग करा. नाहीतर मारहाण करण्याच्या थेट धमक्या देतो. प्रवाशा सोबत बहुतांशी महिला व मुलीअसतात त्यांनाही न जुमानता मागील पुढील विचार न करता थेट अश्लिल शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देतो. अनेकांना रॉडने मारहानी केल्याच्या सुध्दा तक्रारी आहेत. प्रेमाने प्रवाशी भिकाऱ्याला व तृतीय पंथ्याला १० रुपयाऐवजी २० रुपये देतात. मात्र हा मग्रूर ठेकेदार ६ रुपयाच्या पार्कींगसाठी प्रवाशांवर दादागिरी करतो. त्याला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची साथ असल्याची चर्चा आहे. वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहेत. पार्कींग मधील बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून या पार्कींग ठेकेदारावर गुन्हा दाखल झाला असून आता ठेका रद्द करावा अशी मागणी सर्व सत्तरातुन होत आहे.

वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला होत. पार्कींगची पावती नसल्याने बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झालं होतं. त्यानंतर या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होतं. तसेच या मुजोर पार्कींग ठेकेदारावर कठोर कारवाईची मागणी सर्व स्तरातून केली जात होती.

आता या व्हायरल व्हिडीओची पोलिसांकडून गंभीर दखल घेण्यात आली असून शिविगाळ करणाऱ्या ठेकेदारावर अखेर वाशीम शहर पोलिसात विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर २५ दिवसाने पोलिसांनी त्याला ताब्यात घेवून मग्रूर ठेकेदाराचा माफी मांगितल्याचा व्हिडीओ काढला अन् सोशल मिडीयावर व्हायरल केला. त्यानंतर हजारो लोकांनी हा व्हिडीओ व्हायरल करत हे प्रकरण सिटी न्युज सुपरफास्ट पेपर व आआरसी सिटी न्युज चॅनलने लावून धरल्याबद्दल धन्यवाद देवून आभार व्यक्त केले.




## थोडक्यात

### राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत यावर्डीचे १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण



●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

राष्ट्रभाषा प्रचार समिती हिंदी नगर, वर्धा द्वारा दरवर्षी राष्ट्रभाषा हिंदी परीक्षा घेण्यात येते. या शैक्षणिक वर्षांमध्ये श्री बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथिल ४५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले म्हणजेच शाळेचा १०० टक्के निकाल लागला आहे.

बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथे राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा यांचे राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेचे केंद्र २००९ पासून सुरू आहे. त्या अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये प्राथमिक परीक्षेला १४ विद्यार्थी, प्रारंभिक परीक्षेला १६ विद्यार्थी तर शुद्धलेखन परीक्षेला १५ विद्यार्थी असे एकूण ४५ विद्यार्थ्या प्रविष्ट झाले होते. सर्वच्या सर्वच विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. राष्ट्रभाषा हिंदी परीक्षा शाळेचे मुख्याध्यापक विजय भड यांच्या मार्गदर्शनात समन्वयक अनिल हजारे यांनी २००९ पासून यशस्वीपणे राबवत आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन मुख्याध्यापक विजय भड व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या गौरव करण्यात आला.

### संतोष इढोळे यांची राज्यस्तरीय 'आयडॉल शिक्षक' पदी निवड




**उकळी पेन :** येथील आदर्श शिक्षक संतोष इढोळे यांची २०२५-२६ वर्षासाठी राज्यस्तरीय आयडॉल शिक्षक पदी निवड झाल्याने वाशिम जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची बाब ठरली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी विविध अभिनव उपक्रम राबवून त्यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय 'आयडॉल शिक्षक' म्हणून त्यांची निवड करण्यात आली. या निवडीमुळे उकळी पेन गावासह संपूर्ण वाशिम जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# शहरात १० दिवसाआड गढुळ पाणी पुरवठा !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

### * अनेक ठिकाणी पाण्याचा अपव्यय * नागरिकांचे आरोग्य धोक्यात





शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या एकबुर्जी धरणात मुबलक पाणी साठा उपलब्ध आहे. नगर प्रशासनाच्या नियोजन अभावी कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे. मात्र १० दिवसाआड नळाला येणारे पाणी अन् तेही गढूळ त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

नियोजनाअभावी नागरिकांना वेळेवर शुध्द पाणी न देवू न शकणारे समस्या काय सोडविणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. शहरासाठी नवीन पाणी पुरवठा योजना सुरू आहे. नागरिकांकडून नवीन नळ कनेक्शन देवून हजारो रूपये वसूल केले. दरवर्षी पाणी कराच्या नावाखाली करोडो रूपयाचा महसुल नगर पालिकेला मिळत आहे. यावर्षी पावसाळा चांगला झाल्याने एकबुर्जी धरणेही ओव्हर फ्लो झाले होते. शहराच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यावरही शासनाने डल्ला मारला. शेतकऱ्यांच्या जमीनी जावूनही शेकऱ्यांना नियोजनाअभावी एकबुर्जी धरणाचे पाणी मिळत नाही. दुसरीकडे करोडो रूपये खर्च करून पेनगंगा बॅरेजमधून पुन्हा शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी आणण्याची तयारी सुरू आहे. मात्र नियोजनाअभावी पाणी असूनही शहराला ८ ते १० दिवसाआड गढुळ पाण्याचा पुरवठा होत आहे. कोरोना संकटातच गढुळ पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहेत. स्वच्छतेसाठी पाण्याचा वापर वाढला आहे. नगर पालिका आठ ते दहा दिवसाआड गढूळ पाणी सोडते आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तर काही ठिकाणी पाण्याचा अपव्यय होत आहे. या सर्व प्रकाराला जनता त्रस्त झाली आहे.

### नियोजनाचा अभाव, कसा होणार निभाव...

**एकाच वेळी ८ ते १० घंटे पाणी**

नागरिकांकडून दररोज २४ तास पाणी पुरवठ्याचे कर भरून घेवून नगर पालिका प्रशासन १० दिवसाआड गुढूळ पाणी पुरवठा करीत आहे. तेही एकाच दिवशी ८ ते १० तास पाणी सोडून पाण्याचा अपव्यय होत आहे. हेच पाणी ४ दिवसाआड २ ते ३ घंटे सोडले तर पाण्याचे नियोजन होईल. नागरिकांना पाणी मिळेल. मात्र, नियोजनाचा अभाव असल्याने नागरिकांचा पाण्याचा निभाव कसा होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### आईच्या मृत्यू दाखल्यासाठी दिला त्रास...

# लाच घेणारा शिपायाला एसीबीचा फास !

## अडीच हजाराची लाच आली गळ्यात, शिपाई अटकला एसबीच्या जाळ्यात

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

आईच्या निधनानंतर जमिनीच्या हिश्शासाठी आवश्यक असलेला मृत्यूचा दाखला देण्यासाठी २५०० रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या डोंगरकिन्ही (ता. मालेगाव) येथील ग्रामपंचायत शिपायाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) बुधवारी रंगेहात पकडले. राजेश बळीराम बाविस्कर (वय ५४) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



तक्रारदार यांच्या आईचे निधन झाले होते. कौटुंबिक शेतजमिनीची हिस्सेवाटणी करण्यासाठी त्यांना आईच्या मृत्यू दाखल्याची अत्यंत गरज होती. हा दाखला मिळवण्यासाठी त्यांनी डोंगरकिन्ही ग्रामपंचायतीचे शिपाई राजेश बाविस्कर यांच्याकडे विचारणा केली. मात्र, 'दाखला मीच तयार करून देतो, पण त्यासाठी अडीच हजार रुपये द्यावे लागतील. पैसे दिले नाही तर दाखला मिळणार नाही,' अशी भूमिका बाविस्कर यांनी घेतली. शासकीय कामासाठी लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने वाशिम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेऊन तक्रार नोंदवली. तडजोडीअंती सापळा यशस्वी एसीबीने ११ मार्च २०२६ रोजी दुपारी या तक्रारीची पडताळणी केली. यावेळी पंचांसमक्ष बाविस्कर यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तडजोडीअंती २ हजार रुपये स्वीकारण्याचे बाविस्कर यांनी मान्य केले. त्यानंतर रचलेल्या सापळ्यात, लाचेची रक्कम स्वीकारून ती शर्टाच्या खिशात ठेवताच दबा धरून बसलेल्या पथकाने बाविस्कर यांना जागीच ताब्यात घेतले. आरोपीच्या अंगझडतीमध्ये लाचेची २ हजार रुपयांची रक्कम आणि मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

मालेगाव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ व ७-अ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीच्या घराची झडतीही घेतली जात आहे. ही कारवाई अमरावती एसीबीचे पोलीस अधीक्षक बापू बांगर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक जगदीश परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अल्का गायकवाड, पोलीस निरीक्षक बालाजी तिप्पलवाड आणि त्यांच्या पथकाने यशस्वी केली.

### महिलांनी केला महिलांचा सन्मान

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



साजिर बहुउद्देशीय महिला विचारमंच, वाशिम यांच्या वतीने दि. ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वैशालीताई देवळे तर मंचच्या अध्यक्षा अरुणाताई ताजणे उपस्थित होत्या.

यावेळी डॉ. तेजल गायकवाड, डॉ. जयश्री गुट्टे, डॉ. प्रीती इढोळे, डॉ. हर्षाली जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी लेखन, वेशभूषा, समयसूचकता, नृत्य व गायन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी वाशिम शहरातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. तसेच महिला सक्षमीकरण, आरोग्य, संरक्षण व सामाजिक जबाबदारी याविषयी डॉ. हर्षाली जाधव, डॉ. प्रीती इढोळे, डॉ. तेजल गायकवाड व डॉ. अलका मकासरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरुणाताई ताजणे यांच्या मार्गदर्शनाखाली विमलताई सावळे, वैशालीताई अवसरमोल, अश्विनीताई इंगळे, पंचशीलाताई कांबळे, ज्योतिताई इंगळे, सुनीताताई खाडे व प्रतिभाताई अंभोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैशालीताई अवसरमोल यांनी केले. सूत्रसंचालन ज्योतिताई इंगळे व अश्विनीताई इंगळे यांनी केले तर आभार विमलताई सावळे यांनी मानले. हा कार्यक्रम वाटाणे लॉन्स समोर डॉ. तुषार गायकवाड यांच्या फार्महाऊस येथे पार पडला. कार्यक्रमास महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# ऑनलाईन द्वारे 95 हजारांची फसवणूक

प्रतिनिधी १२ मार्च

**अकोला :** आकृती नगर मलकापूर भागातील बाबाराव रामकृष्ण पाटील यांची ऑनलाईन द्वारे ९४ हजार ९९९ रूपयांची फसवणूक झाली असल्याची तक्रार खदान पोलिस ठाण्यात केली आहे.

११ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ०६:४४ ते ०७:०३ या वेळेत फसवणूक केल्याचे पाटील यांचे म्हणणे आहे. मला एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला. त्या व्यक्तीने असा दावा केला की त्याने चुकून माझ्या यूपीआय खात्यावर पैसे ट्रान्सफर केले आहेत. त्याने त्याचा पुरावा म्हणून व्हॉटसॲपवर काही पेमेंट रिसीट्स पाठवल्या, ज्या नंतर तपासल्यावर बनावट असल्याचे आढळले. त्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवून मी त्याने दिलेल्या यूपीआय आयडीवर रक्कम ट्रान्सफर केली. नंतर

## ♦ पोलिसात तक्रार व तात्काळ कारवाईची मागणी



मला समजले की पाठवलेल्या पावत्या खोट्या होत्या व माझी फसवणूक करून पैसे ट्रान्सफर करून घेतले गेले आहेत. फसवणुकीद्वारे झालेले व्यवहार असे आहेत. लाभार्थी साहील मंसुरी याला तसेच एमके ट्रेडर्सला सुमारे ९४९९९.७७/- रक्कम माझ्या खात्यातून फसवणुकीद्वारे काढली गेली आहे.

पाटील यांचे खाते स्टेट बँकेत आहे. बँकेकडे तक्रार करून फंड रिकॉल व लाभार्थी खाते तात्काळ फ्रीझ लावण्याची विनंती केली आहे. या प्रकरणी सायबर फसवणुकीची तक्रार नोंदवावी, संबंधित व्यक्ती/व्यक्तींविरुद्ध तपास करून त्यांची ओळख पटवावी, संबंधित बँकांशी समन्वय साधून लाभार्थी खात्यांवर तात्काळ फ्रीझ लावावे, फसवणूक करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करून माझी रक्कम परत मिळवून देण्यासाठी आवश्यक ती मदत करावी असे पाटील यांनी तक्रारीत म्हटले आहे.

# रुग्णांच्या जीवाशी सुरू असलेला खेळ थांबवा, सनातन संस्कृती महासंघाची मागणी

प्रतिनिधी १२ मार्च



**अकोला :** राज्यातील अनेक खाजगी रुग्णालये व सुतिकागृहात रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याबाबतचे निवेदन सनातन संस्कृती महासंघाने राज्याचे आरोग्यमंत्री यांना जिल्हाधिकारी यांचे मार्फत दिले आहे.

निवेदनात नमूद केले की, राज्यातील शासकीय रुग्णालयांची एकूण संख्या, रुग्णालयातील सोयीसुविधा, मर्यादित खाटा यामुळे अनेक रुग्णांना नाईलाजाने उपचारासाठी खाजगी रुग्णालयात व सुतिकागृहात जावे लागते. राज्यातील खाजगी रुग्णालयांना तसेच सुतिकागृहांना ' दि महाराष्ट्र नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ?क्ट १९४९ अन्वये नोंदणी करणे अनिवार्य असून, त्यातील नियमानुसार रुग्णालयाची व्यवस्था तसेच कर्मचारी आदी ठेवणे ग़रजेचे आहे. परंतु राज्यातील अनेक खाजगी रुग्णालयात तसेच सुतिकागृहात वैद्यकीय तसेच परिचर्या शास्त्र, तंत्र कलेचे शिक्षण घेतलेले सहाय्यक डॉक्टर आणि प्रशिक्षित कर्मचारी नाहीत. ही गंभीर बाब असून कायद्याची पायमल्ली आहे. रुग्णांना यामुळे जीव गमवावा लागू शकतो. बऱ्याच शासकीय व खाजगी रुग्णालयात, सुतिकागृहात गंभीर अवस्थेत असलेल्या रुग्णांना ने आण करण्यासाठी लागणारे साहित्य व वॉर्ड बॉय देखील नाहीत. स्वच्छतेचा अभाव असतो, रुग्णांच्या नातेवाईकांना बसण्यासाठी, पिण्याच्या पाण्याची तसेच वाहनतळाची व्यवस्था नसते. रुग्णालयात, सुतिकागृहात दरपत्रक लावलेले नसते. काही रक्त तपासणी करणाऱ्या प्रयोगशाळात देखील त्या विषयाचे कुठलेही ज्ञान नसलेले कर्मचारी काम करतात.

उपचारापोटी रुग्णांकडून हजारो रुपये उकळणाऱ्या, राज्यातील अनेक खाजगी रुग्णालयात तसेच सुतिकागृहात रुग्णांच्या जीवाशी खेळणे सुरु आहे. प्रशासनाने वेळोवेळी खाजगी रुग्णालये, सुतिकागृह तसेच रक्त तपासणी करणाऱ्या प्रयोगशाळांचे बाहेरगावच्या पथकाकडून निरीक्षण करून नियमांचे काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री करून घ्यावी. होत नसल्यास फौजदारी कारवाई करण्याचे सक्त निर्देश देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी सनातन संस्कृती महासंघातर्फे करण्यात आली आहे.

निवेदन देताना महासंघाचे हेमंत जकाते, नरेंद्र कराळे, अमित शिरसाट, अमोल देशपांडे, मनोज अग्रवाल, महेश शाह, पंकज सिधारा, मोहित नायसे, चेतन घोडके, गोपाल जोशी, ऋषीकेश जकाते आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महानगरपालिकेचा मलेरिया विभाग अनेकदा बंदच

**तक्रार करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना परत जावे लागते**

प्रतिनिधी १२ मार्च



**अकोला :** महानगरपालिकेच्या मलेरिया विभागाबाबत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे हा विभाग अनेकदा बंदच असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे तक्रार करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

अकोला महानगरपालिकेचा मलेरिया विभाग नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाचा विभाग मानला जातो. मात्र या विभागात कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे कार्यालय अनेक वेळा बंदच राहत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मलेरिया, डेंग्यू यांसारख्या आजारांबाबत तक्रार करण्यासाठी नागरिक येथे येतात, मात्र कार्यालयाला कुलूप लागलेले असल्यामुळे त्यांना परत जावे लागते. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. महानगरपालिकेने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# शिवनी खदान परिसरात स्वच्छतागृहाचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत

प्रतिनिधी १२ मार्च

## ♦ परिसरातील नागरिकांना होत आहे मोठी गैरसो



**अकोला :** शहरातील शिवनी खदान परिसरात स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था पाहायला मिळत आहे. स्वच्छतागृहांचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत असल्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

अकोल्यातील शिवनी खदान परिसरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. स्वच्छतागृहांचे दरवाजे तुटलेले असल्यामुळे नागरिकांना त्याचा योग्य वापर करता येत नाही. विशेषतः महिला व वृद्ध नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील नागरिकांनी अनेक वेळा याबाबत संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले जात आहे. मात्र अद्यापही या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन स्वच्छतागृहांची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ४१ अंश तापमानात उष्माघात कक्षाची गरज भासणार

## ♦ जीएमसीच्या मेडिसीन कक्षात रूग्णांची व्यवस्था



प्रतिनिधी १२ मार्च

**अकोला :** शहरात दररोज तापमान वाढत आहे. बुधवारी तर या उन्हाळ्यातील सर्वाधिक म्हणजे ४१ अंश तापमानाची नोंद झाली. मार्च महिन्यातच उष्मा जाणवू लागला आहे. त्यामुळे यंदा उष्माघात कक्षासह यंत्रणा सज्ज राहणे आवश्यक आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मेडिसीन विभागात एक कक्ष सज्ज झाला आहे. वातानुकूलित कक्षात उष्माघाताच्या रूग्णांना भरती केले जाईल असे रूग्णालयाच्या सूत्रांनी सांगितले.

यंदा उन्हाळा चांगलाच ग्रासणार असे दिसते. मार्च महिन्याच्या सुरुवाती पासून त्याची जाणीव होऊ लागली आहे. उन्हाची दाहकता सकाळ पासून जाणवते. त्याचा परिणाम जनजीवनावर दिसत आहे. दुपारी रस्ते ओस पडलेले दिसतात. येत्या काही महिन्यात उन्हाची तीव्रता वाढलेली दिसेल असा अंदाज आहे.

# पत्नीच्या मारहाणीत पतीचा मृत्यू

## ♦ खारतळेगावातील घटना पोलिसांनी पत्नीला घेतले ताब्यात

प्रतिनिधी १२ मार्च

**अमरावती:** पती दारू पीत असल्याने झालेल्या भांडणात पत्नीने पतीला मारहाण केल्याने पतीचा जागीच मृत्यू झाला. भातकुली तालुक्यातील खारतळेगावात घटना उघडकीस आली. मंगेश देविदास गोटे ४५ वर्ष असे मृतक पतीचे नाव असून वलगाव पोलिसांनी पत्नीला ताब्यात घेतले आहे.

# हिवरखेड परिसरात वाघाचा आतंक

प्रतिनिधी १२ मार्च

**हिवरखेड :** नजीकच्या सौंदळा येथील शेतकरी बाळकृष्ण मनोहर जवंजाळ यांच्या वारखेड शेत शिवारातील शेतात दिनांक ११ मार्च रोजी मध्यरात्री ते १२ मार्च च्या पहाटेपर्यंत पट्टेदार वाघाने आतंक माजवून पाच पाळीव प्राणी व एक जंगली प्राणी अशा एकूण ६ जनावरांचा फडशा पाडल्याची धक्कादायक घटना घडली आहे...सदर घटनेचे प्रत्यक्षदर्शी शेतात काम करणारे दादाराव कांबळे हे होते. हा सर्व भयावह थरार त्यांनी अनुभवला स्वतःचा जीव वाचविण्यासाठी त्यांनी शेतातील खोलीत आधार घेतला म्हणून त्यांचा जीव वाचला.. वाघाचा आतंक इतका होता की आपले प्राण वाचविण्यासाठी दोन गाई, एक मोठा गोरा, दोन पाळीव कुत्रे, आणि जंगली डुक्कर या सर्वांनी एकत्रित येत वाघाशी लढताना कडवी झुंज दिली पण त्यांच्या संघर्षाला यश आले नाही आणि क्रूर वाघाने सर्व सहाच्या सहा जनावरांचा फडशा पाडला. यापैकी दोन पाळीव कुत्र्यांचे तर

## ♦ बिबट्याने फस्त केले तीन जनावरे



अवशेष सुद्धा उरले नाहीत आणि एका मोठ्या गोऱ्याचा एक पाय आणि शरीराचा अर्धा अवशेष फस्त केलेला आहे. परिसरातील हजार दोन हजार फूट क्षेत्रात मृत जनावरांच्या अवशेष विखुरलेले आहेत. अशी माहिती शेतकऱ्यांनी आणि सौंदळ्याचे पोलीस पाटील राजेंद्र चणेकर यांनी दिली.. सदर घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली असून पंचनामा करण्यासाठी वनविभागाचे पथक पोहोचत आहे.

# रामदेव बाबा मंदिरासमोर कचऱ्याच्या ढिगाऱ्याला आग

**अग्निशामन दल उशिरा पोहोचल्याने नागरिकांत नाराजी**

प्रतिनिधी १२ मार्च

**अकोला :** गीता नगर परिसरातील रामदेव बाबा व श्याम बाबा मंदिरासमोर सुक्या झाडीला व कचऱ्याच्या ढिगाऱ्याला अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूर पसरला असून वाहनचालक व नागरिकांना तीव्र उष्णतेचे चटके सहन करावे लागले.

मिळालेल्या माहितीनुसार, रस्त्याच्या कडेला साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यासह सुक्या झाडांना आग लागल्याने काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने धुरामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागला.



परिसरातील नागरिकांच्या मते, हा कचरा मुद्दाम पेटविण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तातडीने अग्निशामन दलाला फोन करून कळविले. मात्र, अग्निशामन दलाचा फोन उचलला गेला नसल्याचे नागरिकांनी सांगितले. दरम्यान, आग बऱ्याच प्रमाणात आटोक्यात आल्यानंतर अग्निशामन दलाची गाडी घटनास्थळी पोहोचली. त्यामुळे अग्निशामन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून, अशा घटनांवर तात्काळ प्रतिसाद देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सुसंस्कार व संघटन हेच बलशाली भारताचे भविष्य -भागवताचार्य वासुदेव महाराज वाघ

प्रतिनिधी १२ मार्च



**बाळापूर:** सुसंस्कार व संघटन हेच बलशाली भारताचे भविष्य आहे असे प्रतिपादन भागवताचार्य वासुदेव महाराज वाघ यांनी केले.

येथील श्री सिद्धेश्वर हनुमान मंदिरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षपूर्ती निमित्त आयोजित विशाल हिंदू संमेलनात ते बोलत होते. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ध्वजारोहण करून संमेलनास सुरुवात झाली. मंचावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र गोवा व मध्य प्रदेश धर्म जागरण प्रमुख महेंद्र रायचुरा, कीर्तनकार संगीताताई जोध उपस्थित होत्या.

या दोन्ही मान्यवरांनी विचार व्यक्त केले. जोपर्यंत संस्कार नाहीत तोपर्यंत मनुष्य जीवनाला कुठलाही अर्थ नाही. पैसा किती असला परंतु जीवनात शिस्त आणि अनुशासन या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत महाराजांनी रावणाजवळ सोन्याची लंका होती परंतु त्याच्याजवळ शिष्टाचार नव्हता त्यामुळे त्याचा समोर सर्वांनाच झाला अशा अनेक उदाहरणांनी आपले विचार व्यक्त केले.

त्याचबरोबर कश्यप इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर संगीतमय नृत्य सादर केले. विशाल सिंग ठाकूर यांनी त्यांच्या समूहासह शस्त्र प्रशिक्षण सादरीकरण केले. उत्कृष्ट तलवारबाजी करून सर्व उपस्थितांची मने जिंकली. हिंदू संमेलन शहरातील मध्यवर्ती भागात श्री सिद्धेश्वर हनुमान मंदिर जुना जीन या ठिकाणी अत्यंत उत्साह पूर्व वातावरणात पार पडले संमेलनाचे सूत्रसंचालन मिश्रा यांनी केले. संमेलन स्थळ संपूर्ण परिसर भगव्या झेंड्यांच्या सजावटीने शोभून दिसत होता. गावातील व परिसरातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होऊन संमेलनाची शोभा वाढवली. संमेलन यशस्वी करण्यासाठी समाजातील धर्म धर्मप्रेमी नागरिकांनी आपली सेवा समर्पित केली सर्व स्वयंसेवक बंधू धर्मप्रेमी नागरिक यांच्या अहोरात्र कस्टमर सहकार्याने संमेलन यशस्वीरित्या पार पडले.

# रोजगार हमी योजनेतील गोंधळ थांबवा अन्यथा रस्त्यावर उतरू : प्रशांत डिक्कर

प्रतिनिधी १२ मार्च

**तेल्हारा:** तालुक्यातील 'रोजगार हमी योजना - फळबाग लागवड' अंतर्गत होणारी कामे वेळेतर आणि पारदर्शक पद्धतीने व्हावीत, वा मागणीसाठी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर यांनी उपजिल्हाधिकारी (रोहयो), अकोला यांना निवेदन देऊन आक्रमक पवित्रा घेतला आहे.

शासकीय ऑनलाइन पोर्टल वारंवार बंद पडत असल्याने आणि तांत्रिक त्रुटींमुळे शेतकयांचे फळबाग अनुदान रखडले असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

प्रामुख्याने केळी, संत्रा आणि लिंबू उत्पादक शेतक-यांना याच्या मोठा फटका बसत आहे. मरेगा (श्उर्ँ) कामाचा ब्लू-प्रिंट आराखडा आणि सविस्तर अंदाजपत्रक वेळेत मिळत नाही, तसेच डेटा फ्रीज करण्याच्या कामात ऑपरेटरकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप डिक्कर यांनी केला आहे. कृषी विभागासाठी स्वतंत्र डेटा ऑपरेटरचा नियुक्ती करावी, कामापूर्वीचे 'जिओ टॅगिंग करण्याचे अधिकार स्वतंत्रपणे कृषी विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना द्यावेत, अकुशल कामाचे मस्टर काढताना येणाऱ्या अडचणी दूर करून ते ग्रामपंचायत स्तरावरच निर्गमित व्हावे, पावसाची अनिश्चितता आणि वाढता खर्च पाहता, सर्व पात्र फळबाग धारकांना प्रोत्साहनपर अनुदान त्वरित मिळावे, प्रशासनाने या मागण्यांची तात्काळ दखल न घेतल्यास आणि कामात सकारात्मक बदल न झाल्यास आगामी काळात स्वराज्य पक्षाच्या वतीने 'लोकशाही मागनि तीव्र आंदोलन छेडले आईल, असा इशारा उपजिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे देण्यात आला असून आता प्रशासनाच्या भूमिकेकडे शेतकयांचे लक्ष लागले आहे.

# एसटीच्या स्मार्ट कार्डासाठी प्रवास भाडे सवलत घेणाऱ्यांची गर्दी



प्रतिनिधी १२ मार्च

**खामगाव :** एसटी प्रवास सवलत घेणाऱ्यांना आता स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे या कार्डासाठी स्थानिक बसस्थानकावर मोठ्या प्रमाणात महिलांसह प्रवास भाडे सवलत घेणाऱ्यांची मोठी गर्दी होत आहे. आतापर्यंत खामगाव आगरातून शेकडो स्मार्ट कार्डची प्रोसेस पूर्ण करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य मार्गपरिवहन महामंडळाच्या ५० टक्के सवलत योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करण्याची वेळ आली आहे.महिला सन्मान योजनेसाठी आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड हे स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी राज्य शासनाने २०२३ च्या अर्थसंकल्पातच महिला सन्मान योजना जाहीर केली होती. सुरूवातीला केवळ आधार कार्ड किंवा ओळखपत्र दाखवून महिलांना अर्ध्या तिकीटात प्रवास करता येत होता.मात्र आता केंद्र सरकारच्या एक देश एक कार्ड या धोरणांतर्गत एसटी महामंडळाने तिकीट यंत्रणा अद्यावत केली असून सवलतीसाठी स्मार्ट कार्ड अनिवार्य केले आहे. त्यामुळे या कार्डासाठी सवलत घेण्याऱ्या प्रवासांना १९९ रूपये शुल्क मोजावे लागत आहे. गेल्या महिन्यापासून सदर कार्ड काढण्यासाठी स्थानिक बसस्थानकावर मोठ्या प्रामाणात लाडक्या बहिणींसह प्रवास भाडे सवलत घेणाऱ्या लाभार्थ्यांची गर्दी होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK